## एअर इंडिया करू शकते १२० मिलियन डॉलर्सहून अधिकचा इन्शुरन्स क्लेम

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

अहमदाबादमधील विमान दुर्घटनेमुळे संपूर्ण देश हादरला आहे. या दुर्घटनेत २६५ जणांचा मृत्यू झाला आहे. या विमान अपघाताची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला जात असतानाच याच्या विम्याबाबतचे वेगवेगळे दावे माध्यमांवर पाहायला मिळत आहेत. या अपघातानंकर एअर इंडिया ही कंपनी हवाई वाहतूक क्षेत्रातील सर्वात मोठा इन्शुरन्स क्लेम (विमा दावा) करू शकते. तसेच हा भारतातील सर्वात मोठा इन्शुरन्स क्लेम देखील असू शकतो. तज्ज्ञांच्या मतानुसार एअर इंडिया कंपनी या अपघाताशी संबंधित जो इन्शुरन्स क्लेम करेल त्याची रक्कम अंदाजे १२० मिलियन डॉलर्सहून (जवळपास १०,३३,०२,२२,७८८ रुपये) अधिक असू शकते.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | » शनिवार, १४ जून २०२५ | » वर्ष: १० » अंक: ४५ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


अग्राग्रलेख

## खरीखरी

### कडूपणा घालवा, गोडवा वाढवा

बच्चू कडू या नावाचे कोडे केवळ बच्चू कडूच सोडवू शकतात. सर्वसामान्य जनतेसाठी सदैव उभ्या असलेल्या बच्चू कडू यांनी गेल्या सहा दिवसांपासून उपोषण सुरू केलेले आहे. कडू यांची स्वतःची कोणतीही मागणी नाही. हे आम्ही मुद्दाम नमूद करत आहोत. त्यांचे मागणे एकच आहे, सरकारने निवडून यापूर्वी जीजी आश्वासने दिली होती. ती आता पूर्ण करावीत. हे सरकार सत्तेत येण्यापूर्वी त्यांनी जी काही आश्वासने दिली होती. त्याच वेळी कॉंग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची तीन लाखांची किंवा तीन लाखापर्यंतची कर्जे माफ करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. त्याला तोड म्हणून आपण सर्व शेतकऱ्यांचा संपूर्ण 7-12 कोरा करू. असे आश्वासन महायुतीने दिले होते. मग त्यानंतर आम्ही महायुतीपेक्षा लाडक्या बहिणींना आणि त्यासोबतच इतर योजनांना जास्त निधी देऊ. असे महाविकास आघाडीने म्हटल्याबरोबर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी आपण निवडून आल्यावर दरमहा 2100 रुपये देऊ असे आश्वासन लाडक्या बहिणींना दिलेले होते. याशिवाय शेतकऱ्यांना मोफत वीज, रात्रीच्या वेळी वीज, आणि इतर अनेक सोयी सवलती देण्याचे त्यावेळी बोलण्यात आले होते. तसा जाहीरनामाही प्रसारित करण्यात आला होता. मग तेव्हा म्हणजेच निवडणुकीपूर्वी जी आश्वासने दिली ती पूर्ण करा. असा साधा मागणीचा एक कलमी कार्यक्रम घेऊन बच्चू कडू यांनी उपोषण सुरू केलेले आहे. इकडे सध्याच्या परिस्थितीमध्ये आर्थिक दृष्ट्या पोकळपणा असल्याने, दिलेली आश्वासने पाळली जाण्याची शक्यता कमी झालेली आहे. उद्या लाडक्या बहिणींची धर्माची आणि दरमहाची ओवाळणी देता-देताच सरकारच्या नाकीनऊ आलेले आहेत. प्रत्येक गोष्टींचा इव्हेंट करणे. त्यासाठी नवनवीन घोषणा करणे. हे सर्व खेळ आता जनतेला चांगलेच ठाऊक झालेले आहेत. त्यामुळे सरकारने जीजी आश्वासने दिली. ती पूर्ण करण्यासाठी बच्चू कडून यांनी सुरू केलेले उपोषण सरकारला खूपच महागात पडू शकते. एका सत्ताधाऱ्यांच्या छत्रछायेतील अति शहाण्याने बच्चू कडू यांच्या या उपोषणावर टीका केलेली आहे. निवडणूक हरल्यामुळे आणि जनतेत त्यांचे वजन शिल्लक नसल्यामुळे त्यांचे उपोषण आहे, असे ते म्हणतात. त्यात त्यांनी गुवाहाटीला जाण्याच्या आणि खोक्याचाही उल्लेख केलेला आहे. बच्चू कडू यांना जे जे ओळखतात. त्यांना अशा मूर्खपणाच्या आरोपांवर चर्चाही करावीशी वाटत नाही. आता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कर्मभूमी येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सर्व राज्यभरातून बडे बडे नेते दररोज येत आहेत. बच्चुभाऊ यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. त्यांचा मोलाचा जीव वाचवणे हे सरकारच्या हातात आहे. आमदार असताना हे बच्चू कडू भाऊही अचानक आत्ताच्या सरकारमध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांच्या स्वभाव आणि त्यांच्या निर्धाराबाबत त्यांचा असलेला चिवटपणा सरकारमधील सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळेच आता अधिक ताण न देता बच्चुभाऊंचे उपोषण त्वरित थांबवण्यासाठी सरकारला म्हणजेच मुख्यमंत्र्यांना पुढाकार घ्यावा लागेल. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अतिशय मुत्सद्दी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले जाते. कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आणि तो प्रश्न अधिक न चिघळू देण्यासाठी, जे काही शक्य असते ते देवेंद्र फडणवीसच करतात. असे जनतेला वाटते तेव्हा आता त्यांनी आपली मुत्सद्देगिरी पणाला लावून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनीच ही आघाडी सांभाळावी. असे त्यांना यावेळी सुचवावेसे वाटते. दरवेळी फोन डिप्लोमसी कामाला येतेच असे नाही. त्यामुळेच हा विषय अत्यंत गंभीरतेने येऊन मुख्यमंत्री आपल्या मुत्सद्देगिरीचा परिपाठ देतील आणि परिस्थिती गुंतागुंतीची होऊ नये. म्हणून यशस्वी शिष्टाई करतील. असा आम्हाला विश्वास वाटतो. बच्चुभाऊ यांनाही आमच्या खूप खूप शुभेच्छा आहेत. अत्यंत जिव्हाळ्याच्या म्हणजेच शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन असले. तरीही त्यांचा जीव लाखमोलाचा आहे. हे ही त्यांनी लक्षात घ्यावे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## दुर्घटनेच्या स्थळी पंतप्रधानांचा दौरा



**अहमदाबाद, दि. १३ वृत्तसंस्था**

पंतप्रधान मोदींनी अपघातस्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी घटनास्थळी बचावकार्यांची माहिती घेतली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर लिहिलं आहे की, "अहमदाबादमधील अपघातस्थळी जाऊन पाहणी केली. ही दुर्घटना मन सुन्न करणारी आहे. आपले कार्यकर्ते आणि अधिकारी अथक प्रयत्न करत आहेत. आपली भावना त्यांच्या सोबत आहे, ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं. ही शोकांतिका शब्दात व्यक्त करता येणार नाही अशी आहे. सर्व मृतांच्या कुटुंबीयांना मनापासून शोकसंवेदना. ओम शांती."

त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू किन्जारापु, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याचे गृह मंत्री हर्ष संघवी उपस्थित होते.

## मी मेलोय असेच वाटले

### दोन एअर होस्टेस डोळ्यांदेखत होरपळल्या

### विमान दुर्घटनेत बचावलेल्या रमेश यांची प्रतिक्रिया



**अहमदाबाद, दि. १३ वृत्तसंस्था**

**एअर इंडिया विमानाच्या भीषण अपघातात २६५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असताना, या दुर्घटनेतून एकमेव बचावलेले प्रवासी विश्वास कुमार रमेश यांची कहाणी सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. ब्रिटनमध्ये वास्तव्यास असलेले भारतीय वंशाचे ४० वर्षीय विश्वास कुमार यांनी अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमधून डीडी न्यूजशी संवाद साधला आणि त्या क्षणाचे थरारक वर्णन केले.**

"एक क्षण वाटलं की मीही मेलोय, पण जेव्हा डोळे उघडले, तेव्हा लक्षात आलं की मी जिवंत आहे. अजूनही विश्वास बसत नाही की मी कसा बचावलो," असं विश्वास यांनी सांगितलं. अपघाताच्या वेळी ते इकॉनॉमी वर्गामधील डावीकडील खिडकीजवळ, म्हणजेच रांग 11ए मध्ये बसले होते. ही जागा अगदी आपत्कालीन बाहेर पडण्याच्या दरवाज्याजवळ (इमर्जन्सी एक्झिटजवळ) असते.

#### मोदींनी केली रमेश यांची विचारपूस

**शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलला भेट देत विश्वास कुमार यांची विचारपूस केली. "पंतप्रधानांनी माझी तब्येत विचारली आणि सगळं कसं घडलं ते जाणून घेतलं. मी त्यांना सांगितलं की आता मी ठीक आहे," असं विश्वास यांनी सांगितलं.**

"टेकऑफ झाल्यानंतर अवघ्या ५-१० सेकंदांत विमान हवेत अडकलेले वाटले. अचानक हिरव्या आणि पांढऱ्या रंगाचे दिवे लुकलुकायला लागले. काही कळायच्या आतच विमान एका इमारतीवर जाऊन आदळलं," असं त्यांनी आठवून सांगितलं. त्यांचं विमानाचं भाग जमिनीवरच राहिला, तर उर्वरित विमानाच्या भागांनी जवळच्या मेडिकल कॉलेजच्या इमारतीवर धडक घेतली.

"माझ्या भागात आपत्कालीन दरवाजा होता. तो दिसल्यावर वाटलं, मी बाहेर पडू शकतो. मी प्रयत्न केला आणि यशस्वी झालो. कदाचित विमानाच्या दुसऱ्या बाजूच्या लोकांना तो पर्याय मिळाला नाही," असंही रमेश म्हणाले. अपघातानंतर लागलेल्या आगीत त्यांच्या डाव्या हाताला भाजल्याची माहिती त्यांनी दिली.

**डोळ्यासमोर लोक मरताना पाहिले**

"माझ्या समोर दोन प्रवासी आणि दोन एअर होस्टेस जळून गेले. मी धडपडत त्या धुळीतून आणि कोसळलेल्या धातूंच्या ढिगाऱ्यातून चालत बाहेर आलो," असे त्यांनी अत्यंत भावनिक स्वरात सांगितले .

## एअर इंडियाच्या AI 379 विमानाचे थायलंडमध्ये इमर्जन्सी लँडिंग

**फुकेट, दि. १३ वृत्तसंस्था**

फुकेटहून दिल्लीच्या दिशेनं निघालेल्या एअर इंडियाच्या AI 379 या विमानाचं थायलंडमध्ये इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. अहमदाबादमध्ये एअर इंडियाचं प्रवासी विमान कोसळल्याच्या घटनेला २४ तास व्हायच्या आतच थायलंडमध्ये हे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आल्यामुळे प्रवाशांमध्ये घबराटीचं वातावरण निर्माण झालं आहे. मात्र, विमानाचं लँडिंग कोणत्याही तांत्रिक बिघाडामुळे करण्यात आलेलं नसून विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याच्या धमकीमुळे करण्यात आल्याचं फुकेट विमानतळ प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात विमातळ प्रशासनाने दिलेल्या माहितूनुसार, अशा परिस्थितीत स्टँडर्ड प्रोटोकॉल्सनुसार विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं होतं. यानंतर विमानातील प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं. विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी आली तेव्हा विमानात १५६ प्रवासी होते अशी माहिती थायलंड विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली. हे विमान भारतीय प्रमाणवेळेनुसार शुक्रवारी सकाळी ९.३० च्या सुमारास फुकेटहून दिल्लीच्या दिशेनं निघालं होतं. पण विमान हवेत असतानाच बॉम्ब ठेवल्याची धमकी आल्यानंतर अंदमान समुद्रात एक मोठी गिरकी घेऊन विमान पुन्हा फुकेट विमानतळावर आणण्यात आलं. दरम्यान, विमानातील इतर तपासणी सध्या चालू असून त्यानंतरच सविस्तर माहिती दिली जाईल, असं फुकेट विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

## विमानाचा डीव्हीआर सापडला

### शेवटच्या क्षणी नेमके काय घडले याचे रहस्य उघड होणार

**अहमदाबाद, दि. १३ वृत्तसंस्था**

राज्याच्या एटीएसला अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या अवशेषांमधून डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर (DVR) मिळाला आहे. ही उपकरणे या भीषण दुर्घटनेच्या तपासासाठी अत्यंत महत्त्वाचा पुरावा ठरू शकते. डीव्हीआर बोईंग ७८७ ड्रीमलाइनर विमानाच्या अवशेषांमध्ये सापडले. हे बोईंग सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही क्षणांतच कोसळले होते. विमान बी.जे. मेडिकलच्या यूजी होस्टेल मेसवर आदळले होते. या दुर्घटनेत २४ वैद्यकीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अजूनही अनेक वैद्यकीय आणि नर्सिंगचे विद्यार्थी जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गुजरात एटीएसच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, हे एक डीव्हीआर आहे जे अवशेषांमधून सापडले आहे. फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (FSL) ची टीम लवकरच येथे येऊन या डिव्हाइसची तपासणी करेल. या तपासणीतून दुर्घटनेचं कारण समजण्यास मदत होईल. डीव्हीआरच्या मदतीने विमानाच्या शेवटच्या क्षणांत नेमकं काय घडलं याची माहिती मिळू शकणार आहे.



## वर्सोवा-वांद्रे सी लिंक जुलै 2027 पर्यंत खुला होणार

### वाहतूक कोंडीतून मिळणार दिलासा

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

वर्सोवा-वांद्रे सी लिंक प्रकल्प प्रगतीपथावर असल्याने दोन ते तीन वर्षांत मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळेल अशी शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) मते, आतापर्यंत २५ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. जर सर्व काही योजनेनुसार झाले तर जुलै २०२७ पर्यंत हा सागरी मार्ग जनतेसाठी खुला होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

२०१८ मध्ये, या प्रकल्पाला ११,३३२ कोटी रुपये खर्च आला होता, परंतु आता हा खर्च वाढून १८,१२० कोटी रुपये झाला आहे. या वाढीचे कारण जुहूहून मालाडला कास्टिंग यार्डचे स्थलांतर, तसेच सुशोभीकरण आणि प्रकाशयोजना यासारख्या अतिरिक्त सुविधांमुळे आहे. एकदा सागरी मार्ग पूर्ण झाला की, वर्सोवा आणि वांद्रे दरम्यानचे १२.४ किमीचे अंतर, जे सध्या गर्दीच्या वेळी ४५ ते ६० मिनिटे आहे ते १५ मिनिटांपर्यंत कमी होईल. सागरी मार्ग सुरू झाल्यामुळे लिंक रोड, एसव्ही रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे (डब्ल्यूईएच) वरील वाहतुकीचा ताण कमी होईल, ज्यामुळे अंधेरी आणि वांद्रे दरम्यानचा प्रवास अधिक सोयीस्कर होईल.

## शेलारांच्या गाडीसमोर भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये हाणामारी

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष कामाला लागले आहेत. मुंबई महापालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका आहे. त्यामुळे या महापालिकेवर आपली सत्ता स्थापन व्हावी, यासाठी प्रत्येक पक्षाकडून प्रयत्न केले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महापालिकेवर शिवसेनेचे सत्ता राहिलेली आहे. पण आता शिवसेनेत फूट पडली आहे. ठाकरे गटाने विधानसभा निवडणुकीत मुंबईत चांगलं यश मिळवलं आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाची मुंबईत ताकद आहे हे स्पष्ट झालंय. ठाकरे गटाला मुंबई महापालिकेत मागे टाकून सत्ता काबीज करण्यासाठी भाजप चे सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत. भाजप त्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबतही युती करण्याच्या तयारीत आहे. एकीकडे भाजपची मुंबई महापालिका निवडणुकीसाठी रणनीती सुरु आहे तर दुसरीकडे मुंबईतच भाजपमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. ही गटबाजी थोडीथोडकी नाही तर भाजपच्या दोन गटात आज चक्क मोठा राडा झाला आहे.

भाजप नेते आशिष शेलार हे आज कांदिवली येतील जानूपाडा परिसराच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या दौऱ्यावेळीच भाजपमधील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली. इतकंच नाही तर भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये आशिष शेलार यांच्यासमोरच हाणामारी झाली. या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. आशिष शेलार यांची गाडी बाहेर पडत असताना दोन गट एकमेकांसमोर भिडले. यावेळी दोन्ही गटात हाणामारी झाली.

भाजपच्या एका स्थानिक पदाधिकाऱ्याने माध्यमांना प्रतिक्रिया दिली. "पालकमंत्री आशिष शेलार हे आज जानूपाडूच्या नागरिकांना भेटण्यासाठी आले होते. इकडे मागच्या ५० वर्षांपासून जानूपाडावासी पीडित आहेत. वनजमीन आहे की नाही या गोंधळामुळे त्यांना आज मुलभूत सुविधा मिळत नाही. त्यांना आशिष शेलार आश्वासन देण्यासाठी आले होते की, यापुढे कुठल्याहीप्रकारे वनाचा त्रास होणार नाही. कारण डीपीडीसीमध्ये आशिष शेलार यांनी त्यांचा प्रस्ताव पारित केला आहे. ते केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत बातचित करुन या विषयावर तोडगा काढणार आहेत", अशी प्रतिक्रिया भाजप पदाधिकाऱ्याने दिला.

या दरम्यान काही स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली. हा आमचा अंतर्गत विषय असून पक्षाने आणि पक्षश्रेष्ठींनी मला आश्वासित केलंय की, याबाबतची दखल त्यांनी घेतली आहे. यापुढे योग्य ती कारवाई पक्ष करणार आहे. जे घडलं आहे ते पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसमोर घडलं आहे. त्यामुळे मला पक्षाला जास्त सांगायची आवश्यकता राहिलेली नाही. पक्ष योग्य ती कारवाई करणार आहे", अशीदेखील प्रतिक्रिया संबंधित पदाधिकाऱ्यानी दिली.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नवे धोरण

### भाजप वगळता कुणाशीही युती

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील राजकारणात गेल्या काही काळात अनेक मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या आहेत. राज्यात आधी महाविकास आघाडी आणि नंतर महायुतीची सत्ता आली आणि कधी नव्हे ती राजकीय समीकरणं पाहायला मिळाली. अनेक राजकीय तज्ज्ञांचे अंदाजही फोल ठरले होते. दरम्यान राज्यात पुढील काही दिवसात स्थानिक पातळीवर नवी राजकीय समीकरणं पाहायला मिळू शकतात. स्थानिक पातळीवर भाजप वगळता कुणाशीही राष्ट्रवादी युती करु शकते. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ सूत्रांच्या माहितीनुसार, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने नवं धोरण स्विकारलं आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादी शरद पक्षाने नवं धोरण स्विकारलं आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस स्थानिक पातळीवर भाजपा वगळता कुणाशीही युती करु शकते. महत्त्वाचं म्हणजे स्थानिक पातळीवर अजित पवार आणि एकनाथ शिंदेंशी युतीचाही पर्याय खुला आहे. युतीबाबतचे सर्व अधिकार स्थानिक पातळीच्या नेत्यांवर सोपवले जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

महाविकास आघाडीतील घटक पक्षाची स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र येण्यास फारसे इच्छूक नसल्याची सूत्रांची माहिती आहे. अद्याप महाविकास आघाडीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र येण्याबाबत कोणतीच चर्चा झालेली नाही.

सुप्रिया सुळे यांना यासंदर्भात पत्रकार परिषदेत विचारण्यात आलं असता म्हणाल्या की, "२६ वर्षांपासून स्थानिक नेते ठरवतील हेच आमचं ठरलेलं आहे. तेव्हा जायचं की नाही हे नेते ठरतात. कार्यकर्ते हेच शरद पवारांची ताकद आहे. सत्ता साहेबांकडे एकट्याकडे कधीच राहिली नाही, त्याचं विकेंद्रीकरण झालं. मी तुम्हाला अधिकार देतो, निर्णय घ्या सक्षम व्हा अशी त्यांची भूमिका असते ". दरम्यान यावेळी त्यांना अजित पवारांसोबतच्या युतीसंदर्भात विचारलं असता पाऊस आल्यावर छत्री घ्यायची की रेनकोट हे ठरवू असं उत्तर त्यांनी दिलं.

## इस्रायलचा इराणमधील आण्विक तळांवर हल्ला

### 'ऑपरेशन रायजिंग लायन' सुरू - नेतान्याहूंची घोषणा

**तेहरान, दि. १३ वृत्तसंस्था**

भारतानं पाकिस्तानमध्ये केलेल्या एअर स्ट्राईकची जगभर चर्चा होत असताना इस्रायलनं तशाच प्रकारचा हल्ला इराणमध्ये केला आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार शुक्रवारी पहाटेच्या सुमारास इराणच्या तेहरानमधील अनेक लष्करी तळांवर इस्रायलनं हवाई हल्ले केले. इराणमधील आण्विक तळांना प्रामुख्याने इस्रायलनं लक्ष्य केल्याचं सांगितलं जात आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी 'ऑपरेशन रायजिंग लायन' सुरू केल्याची घोषणा केली आहे. इस्रायलला असणारा धोका पूर्णपणे निपटून काढल्याशिवाय हे ऑपरेशन थांबणार नाही, असा निर्धार यांनी देशाला उद्देशून केलेल्या निवेदनात व्यक्त केला आहे.



दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी यासंदर्भात एका व्हिडीओच्या माध्यमातून निवेदन सादर केलं असून त्यात इराणवरील हल्ल्याबाबत माहिती दिली आहे. "काही वेळापूर्वीच इस्रायलनं ऑपरेशन रायजिंग लायन सुरू केलं आह. इस्रायलच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणाऱ्या इराणमधील संकटाला परतवून लावण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. जोपर्यंत इस्रायलवर आलेलं हे संकट पूर्णपणे निपटून काढलं जात नाही. तोपर्यंत हे ऑपरेशन चालूच राहील", असं बेंजामिन नेतन्याहू यांनी या निवेदनात स्पष्ट केलं आहे.

इस्रायलनं इराणच्या लष्करी व आण्विक तळांवर केलेल्या हवाई हल्ल्यांमध्य इराणच्या आण्विक ताकदीचं मोठं नुकसान झाल्याचं बोललं जात आहे. या नुकासानाला आंतरराष्ट्रीय आण्विक ऊर्जा आयोगानंही दुजोरा दिला आहे. त्यामुळे आता इराणकडून यासंदर्भात कोणतं पाऊल उचललं जातं? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान, इस्रायलनं आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांनंतर आता इराणकडून संतप्त प्रतिक्रिया आली आहे. या हल्ल्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल, असं इराणनं म्हटलं आहे. इस्रायलनं हा हल्ला अमेरिकेच्या मदतीने घडवून आणल्याचा आरोप इराणनं केला आहे. इराणच्या लष्कराचे प्रवक्ते ब्रिगडियर जनरल अबुलफझल शेकरची यांनी इराणच्या राष्ट्रीय वृत्तवाहिनीला दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये भूमिका स्पष्ट केली आहे.

"इस्रायल व अमेरिकेला या हल्ल्याची जबरदस्त किंमत मोजावी लागेल", असा थेट इशारा शेकरची यांनी दिला आहे. इस्रायलकडून हल्ल्यासंदर्भात अमेरिकेला कल्पना दिली होती, अशी माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे आता इस्रायल विरुद्ध इराण यांच्या थेट संघर्षात अमेरिकाही ओढली गेल्याचं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर इराणकडून इस्रायलबरोबरच अमेरिकेविरोधातही पावलं उचलली जाणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### इराणचा आयआरजीसी कमांडर ठार

इराणच्या राज्य माध्यमांनी पुष्टी केली आहे की इस्रायली हल्ल्यात इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) कमांडर हुसेन सलामी यांचा मृत्यू झाला आहे. अल-जझीराच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात इराणी अणुशास्त्रज्ञ मोहम्मद मेहदी तेहरानी आणि फरदून अब्बासी यांचाही मृत्यू झाला आहे. इस्रायलने दावा केला आहे की इराणचे लष्करप्रमुख मोहम्मद बघेरी, इतर वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि काही वरिष्ठ अणुशास्त्रज्ञही या हल्ल्यात मारले गेले आहेत. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी म्हणाले की आमचे सैन्य इस्रायलला शिक्षा झाल्याशिवाय सोडणार नाही.

## सरकार या दुर्घटनेची जबाबदारी नाकारू शकत नाही- राऊत

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

अहमदाबादमधील विमान दुर्घटनेची जबाबदारी अद्याप कोणीही स्वीकारलेली नाही. यावरून शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, "विमानाने उड्डाण केल्यानंतर अवघ्या ३० सेकंदात ड्रीमलायनर विमान कोसळलं. ज्यामध्ये २४२ प्रवासी होते. केवळ ३० सेकंदात विमान कोसळलं याचा अर्थ त्यात काहीतरी गडबड असेल. तरीदेखील त्या विमानाला लंडनसाठी उड्डाणाची परवानगी कशी मिळाली? या सगळ्याची चौकशी होईल आणि सत्य समोर येईल. मात्र, सरकार या दुर्घटनेची जबाबदारी नाकारू शकत नाही.

संजय राऊत म्हणाले, "तपासण्या करून तंत्रज्ञांनी विमानाच्या उड्डाणासाठी परवानगी दिल्यानंतर विमानाने उड्डाण केलं, त्यानंतर ३० सेकंदात विमानाची दोन्ही इंजिनं बंद पडली, हे कसं काय घडलं? नेमकी काय गडबड झाली? याची चौकशी केली जाईल. त्या चौकशीतून काहीतरी निष्पन्न होईल, कदाचित सत्य समोर येईल. मात्र या २६५ मृत्यूंची जबाबदारी कोण घेणार? विमानातील २४२ जण, जिथे विमान कोसळलं तिथले डॉक्टर, विद्यार्थी असे मिळून २६५ जण दगावले आहेत. त्यांच्या मृत्यूंची जबाबदारी कोण घेणार आहे?"

शिवसेनेचे राज्यसभा खासदार म्हणाले, "काल दुर्घटनेनंतर अमित शाहांनी घटनास्थळी भेट दिली आणि म्हणाले की 'हा अपघात होता, अपघात टाळता येत नाहीत'. मला त्यांना विचारायचं आहे की तुम्हाला अपघात टाळता येत नाहीत, तुम्हाला पहलगाममधील दहशतवादी हल्ला टाळता येत नाही. मग तुम्ही सत्तेत कशाला बसलाय? तुमच्या राज्यात (सरकार) कोणीच सुरक्षित नाही. रेल्वे प्रवासी सुरक्षित नाहीत, विमान प्रवासी सुरक्षित नाहीत. पर्यटक सुरक्षित नाहीत. मणिपूरची जनता सुरक्षित नाही. मग तुमच्या राज्यात नेमकं कोण सुरक्षित आहे? या प्रश्नांचं अमित शाहांनी उत्तर द्यावं".




# 10 कोटी वृक्ष लागवडीचे मोठे उद्दिष्ट

## पण वन विभागाकडेच नाहीत पुरेशी रोपे!

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

राज्यात हरित क्षेत्र वाढवण्याच्या दृष्टीने सरकारने "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत वर्ष २०२५ मध्ये तब्बल १० कोटी वृक्ष लागवडीचं उद्दिष्ट जाहीर केलं आहे. मात्र, या मोहिमेला सुरुवातीपासूनच अडथळ्यांची मालिका सुरू झाली आहे. कारण वन विभागानेच वर्ष २०२५ च्या लागवड हंगामासाठी पुरेशी रोपे उपलब्ध नसल्याचं स्पष्टपणे सांगितलं आहे!

राज्य शासनाच्या ताज्या आदेशानुसार, इतर सर्व २६ विभागांनी आपल्या स्तरावर रोपे खरेदी करून वृक्ष लागवडीचं उद्दिष्ट पूर्ण करावं, अशी सूचना महसूल व वन विभागाने दिली आहे. त्यामुळे "ज्यांना उद्दिष्ट दिलं, त्यांनीच व्यवस्था पाहावी" अशी भूमिका स्पष्ट दिसत आहे. हे ऐकून अनेक प्रशासकीय विभागांमध्ये आश्चर्य आणि नाराजी व्यक्त केली जात आहे.

राज्य शासनाने वन विभागासह इतर विभागांना मिळून १० कोटी झाडं लावण्याचं उद्दिष्ट दिलं असून, रेशीम विभागाला सर्वाधिक ४ कोटी वृक्ष, तर पर्यटन विभागाला फक्त १ लाख वृक्ष लावण्याचं लक्ष्य देण्यात आलं आहे. मात्र, उद्दिष्ट दिल्यानंतर वन विभागाकडूनच रोपांची अनुपलब्धता जाहीर होणं ही बाब अधिक चर्चेचा विषय ठरत आहे.

वन विभागाने स्पष्ट केले आहे की, वृक्ष लागवड करताना स्थानिक हवामान व भौगोलिक परिस्थितीनुसार प्रजातींची निवड व्हावी, हे खरे असले तरी रोपे मात्र संबंधित विभागांनीच खरेदी करावीत. यासाठी शासन नियमानुसार निधीची ०.५% तरतूद पूर्वीच्या योजनांतर्गत वापरता येणार असल्याचंही सांगण्यात आलं आहे.

राष्ट्रीय वन धोरणानुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणं आवश्यक आहे. मात्र, सध्या महाराष्ट्रातील वन आणि वृक्षाच्छादनाचं प्रमाण फक्त २१.२५% आहे. यामुळे जागतिक तापमान वाढ, ऋतूचक्रातील बदल आणि हवामानाच्या टोकाच्या स्वरूपावर नियंत्रण आणण्यासाठी ही वृक्षलागवड मोहीम अत्यावश्यक मानली जात आहे.

# एका पत्रकारामुळे फुटली युती!

## अन्यथा भाजप-मनसेची जोडी 12 वर्षांपूर्वीच जुळली असती

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीनंतर भाजप-मनसे युतीचे संकेत पुन्हा एकदा गडद झाले आहेत. मुंबईतील ताज लँड्स एन्ड हॉटेलमध्ये ही बैठक झाली असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीसंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात आज चर्चेचा केंद्रबिंदू असलेली भाजप-मनसे जवळीक, प्रत्यक्षात 12 वर्षांपूर्वीच साकार होणार होती. मात्र एका पत्रकाराच्या 'स्कूप'मुळे ती ऐतिहासिक युती मोडीत निघाली होती, असा गौप्यस्फोट खुद्द राज ठाकरे यांनीच केला आहे.

याआधीही लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपूर्वी अशाच चर्चांना उधाण आले होते. मात्र अधिकृत युती शक्य झाली नव्हती. राज ठाकरे यांनी त्या वेळी महायुतीला बाहेरून पाठिंबा दिला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र मनसेने स्वतंत्र लढत दिली होती. परंतु यंदा परिस्थिती वेगळी आहे. अधिकृत युतीची चर्चा फडणवीस-ठाकरे भेटीत स्पष्टपणे समोर आली आहे.

परंतु या पार्श्वभूमीवर एक जुना घटनाक्रम पुन्हा आठवला जात आहे, जो 12 वर्षांपूर्वी भाजप-मनसे युतीच्या अडथळ्याचं कारण ठरला होता. ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्या The Election That Changed India 2014 या पुस्तकात याबाबतचा उल्लेख आहे.

पुस्तकानुसार, 2014 लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान पदासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांची जबाबदारी नितीन गडकरी यांच्याकडे होती. भाजपमध्ये मनसेसोबत युती करण्याचा विचार प्रबळ होत होता. कारण 2009 मध्ये मनसेच्या उमेदवारांनी महायुतीच्या विजयावर मोठा परिणाम केला होता. मात्र शिवसेनेचा या युतीला तीव्र विरोध होता.



या पेचातून मार्ग काढण्यासाठी नितीन गडकरी आणि राज ठाकरे यांच्यात गुप्त बैठक आयोजित करण्यात आली होती. पण ही गोपनीयता फार काळ टिकली नाही. राज ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार, "आम्ही दोघं हॉटेलच्या लिफ्टमध्ये होतो. पण एका पत्रकाराने आम्हाला पाहिलं. आणि दुसऱ्याच दिवशी मीडियामध्ये ही बातमी फोडली गेली." त्यामुळे नियोजित युती पूर्ण होण्याआधीच धुळीस मिळाली.

परिणामी, राज ठाकरे यांनी त्या वेळी उमेदवार उभे न करता नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला, पण युती झाली नाही.

आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. त्या वेळी मनसेविरोधात उभी असलेली शिवसेना आता भाजपसोबत नाही. उलट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना, मनसेला महायुतीत सामावून घेण्यास उत्सुक आहे. भाजपसह इतर घटक पक्षीही सकारात्मक आहेत.

# "विठुरायासाठी पायी वाटचाल... आणि वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना 'चरणसेवा'चा आधार!"

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी पायी निघाले आहेत. या अध्यात्मिक यात्रेच्या प्रवासात त्यांच्या थकलेल्या पावलांना आता नवसंजीवनी मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून आणि दूरदृष्टीतून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला जात आहे.

राज्यात नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांतून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांना फिजिओथेरपी आणि तत्काळ उपचाराच्या माध्यमातून आराम मिळावा, यासाठी सुमारे ५ हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. शुक्रवार, १३ जून रोजी मंत्रालयात या उपक्रमाची माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेतील गाभा असलेल्या आषाढी वारीत सहभागी होताना वारकऱ्यांना होणाऱ्या शारीरिक त्रासावर उपाय म्हणून 'चरणसेवा' उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये वैद्यकीय अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच स्वयंसेवकांचा समावेश आहे.

या उपक्रमाअंतर्गत रोज दीर्घ अंतर चालल्यानंतर थकलेल्या, सूज आलेल्या किंवा वेदनांनी ग्रस्त पायांवर शास्त्रोक्त पद्धतीने उपचार केले जात आहेत. तसेच, याच केंद्रांवर केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहितीही वारकऱ्यांना दिली जात आहे.

वारकऱ्यांच्या दिंडीसाठी राज्यभरात एकूण ४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली असून, त्या ठिकाणी सुसज्ज वैद्यकीय तपासणी केंद्रे कार्यरत आहेत. ही सेवा स्थानिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि शासकीय-खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या समन्वयाने राबवली जात आहे. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारीही सक्रिय सहभाग घेत आहेत.

पंढरपूरच्या दिशेने पावलोपावली भक्तीचा झराच वाहतो आहे. परंतु त्या प्रवासात थकलेल्या शरीराला सरकारने दिलेला 'आरोग्यसेवेचा हात' ही आधुनिक काळातील भावसेवा ठरते आहे. 'चरणसेवा' ही केवळ एक वैद्यकीय सेवा नसून, ती आधुनिक युगातील भक्ती आणि सेवेचा संगम ठरत असल्याची भावना अनेक वारकरी व्यक्त करत आहेत.

# चेंबूर वसतीगृहात विद्यार्थ्यांसाठी सुविधांचा पाऊस!

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

चेंबूरमधील नव्याने सुरू करण्यात आलेल्या शासकीय वसतीगृहातील एक हजार विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सोयीसुविधा पुरवण्यासाठी राज्य सरकारने २ कोटी ८१ लाख ६४ हजार रुपये खर्च करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेतून ही सुविधा दिली जाणार आहे. राज्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी वसतीगृह योजना राबवली जाते. सध्या राज्यात ४४३ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून, त्यात एकूण ४३,८५८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निवास, जेवण, शैक्षणिक साहित्य, गणवेश, निर्वाह भत्ता, आणि मुलींसाठी स्वच्छता भत्ता यांसारख्या महत्त्वाच्या सुविधा दिल्या जातात.

चेंबूर येथील नव्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी खालील वस्तूंची खरेदी होणार आहे: लोखंडी कॉट,कार्यालयीन टेबल, संगणक, वॉटर प्युरिफायर, डायनिंग टेबल, लाकडी टेबल व खुर्च्या (हात असलेल्या), अग्नीशामक यंत्र,सीसीटीव्ही प्रणालीसाठी साहित्य या सर्व सुविधांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सामाजिक विकास अधिक गतिमान होणार असून, वसतीगृहातील वातावरण अधिक सुरक्षित आणि आधुनिक होणार आहे.

# फोर्टमध्ये मनसेच्यावतीने आज रक्तदान शिबिर

**मुंबई दि. १३ प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना कुलाबा विधानसभा यांचे वतीने आज शनिवार, 14 जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वे सर्व राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान म्हणून रक्तदान करा. हे घोषवाक्य घेऊन बाई कबीबाई स्कूल समोर बोरा बाजार फोर्ट, मुंबई येथे सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. राजसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली मनसे नेते बाळा नांदगावकर, संदिप देशपांडे आणि यशवंत किल्लेदार यांच्या सुचनेने हे शिबिर पार पडणार आहे.इच्छुकांनी आणि विभागातील नागरिकांनी या ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन विभाग अध्यक्ष श्री बबन महाडिक, कमल खोत, शाखा अध्यक्ष दर्शन मिरजोळकर आणि उपविभाग सचिव सचिन गंगावणे यांच्यासह सर्व मनसे पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# आयटीआयच्या विद्यार्थ्यांना स्थानिक उद्योगातच अॅप्रेन्टीसशिप मिळणार- मंत्री मंगलप्रभात लोढा

## प्रतिवर्षी एक लाख उमेदवारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

आयटीआयच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या जिल्ह्यातच स्थानिक उद्योगात शिकाऊ उमेदवारी अर्थात अॅप्रेन्टीसशिप द्यावी, असे आदेश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना आता त्यांच्या जिल्ह्यातल्या उद्योगात विद्यावेतनासह काम करण्याची संधी मिळणार आहे.

केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग करून कुशल कारागिरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी, राज्यात 'महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना' राबवण्यात येत आहे. मंत्री श्री. लोढा यांच्या नेतृत्वात प्रतिवर्षी तब्बल एक लाख उमेदवारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार ३० व त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) असलेल्या आस्थापनांमध्ये एकूण मनुष्यबळाच्या किमान २.५ टक्के ते कमाल २५ टक्के शिकाऊ उमेदवारीच्या जागा स्थित करणे बंधनकारक आहे. सदर योजना २७ गटातील २५८ निर्देशित (Designated), ३५ क्षेत्रातील ४१४ वैकल्पिक (Optional) तंत्रज्ञ (व्यवसायिक) अंतर्गत सहा गटातील २० आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाच्या १२३ व्यवसायांना शिकाऊ उमेदवारी लागू करण्यात आली आहे. शिकाऊ उमेदवारीचा कालावधी व्यवसायनिहाय सहा ते ३६ महिने आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षित (trained) तसेच अप्रशिक्षित (Fresher) उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात आहे.

शासकीय, निमशासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहित करण्यासाठी 'महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना' राज्यात मोठ्या प्रमाणावर राबवली जात आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सुधारित अभ्यासक्रमांचाही वेळोवेळी आढावा घेऊन त्या ट्रेड्स या योजनेत समाविष्ट केल्या जातील. राज्य आणि केंद्र शासनाच्या नियमानुसार मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना आवश्यक ती प्रतिपूर्ती केली जाणार आहे. दरम्यान राहत्या जिल्ह्यातच स्थानिक उद्योगात शिकाऊ उमेदवारी अर्थात अॅप्रेन्टीसशिप मिळत असल्याने आयटीआयच्या हजारो विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या २०० विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपसाठी नियुक्ती दिली जात होती. मात्र गेल्या काही वर्षांपासून या नियुक्त्या दिल्या जात नव्हत्या. आता महानगरपालिकेत पूर्वीप्रमाणे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामधील विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपसाठी नियुक्ती देण्याबाबत मंत्री श्री. लोढा प्रयत्नशील असून यासंदर्भात त्यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना पत्रही दिले आहे. लवकरच मुंबई महापालिकेसोबत इतर महापालिकांमध्येही विद्यार्थ्यांना अॅप्रेन्टीसशिपची संधी मिळणार आहे.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करा- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मुंबईकरांसाठी फुफ्फुस आहे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी राष्ट्रीय उद्यान आवश्यकच असून यामधील नागरिकांचे पुनर्वसन करणेही तेवढेच गरजेचे आहे. त्यातही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. उद्यानाच्या १० किलोमीटर परिसरातच पुनर्वसन झाले पाहिजे. न्यायालयाच्या निर्देशानुसार या ठिकाणी सर्व नागरी सुविधांची उपलब्धता करून द्यावी. नागरिकांना जास्त लांब पुनर्वसन करून त्यांची गैरसोय होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. पुनर्वसन करताना नागरिकांना अतिरिक्त चटई निर्देशांक देऊन त्यांना प्रशस्त घरे मिळतील याची दक्षता घेण्यात यावी. गोरक्षधाम येथील जागेचा पुनर्वसनासाठी विचार करण्यात यावा या जागेची पाहणी करून पुनर्वसनाबाबत पडताळणी करावी. वनविभागाच्या जमिनीबाबत विभागासोबत स्वतंत्र बैठक घेण्यात यावी, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. विलेपार्ले येथील विमानतळ प्राधिकरणाच्या जागेतील जॉगर्स पार्क आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील नागरिकांचे पुनर्वसनाबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस विधान परिषदेच्या माजी आमदार विद्या चव्हाण, माजी आमदार किरण पावसकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव के. गोविंदराज, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आदी उपस्थित होते.

विमानतळाच्या फनेल झोनमध्ये इमारतींच्या पुनर्विकासाबाबत आढावा घेताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, फनेल झोनमधील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. पुनर्विकासाबाबतचे धोरण ठरविताना आलेल्या सूचना व हरकतींचा अभ्यास करून त्रुटी दूर करण्यात येतील. फनेल झोनमधील नागरिकांची पुनर्विकासबाबत होणारी अडचण निश्चितच दूर केल्या जातील.

# डोंगरांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी धोरण तयार करावे- मुख्यमंत्री

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये डोंगरांवर बऱ्याच झोपडपट्ट्या आहेत. अशा झोपडपट्ट्या पावसाळ्याच्या दिवसात भूस्खलन तसेच दरड कोसळल्यास धोकादायक ठरतात. डोंगरांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत पात्र झोपडपट्टी धारकांचे त्यांच्या सध्याच्या निवासाच्या नजिकच पुनर्वसन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बैठकीत आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर आदी उपस्थित होते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीसाठी जागा खरेदी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अहमदाबाद येथील भास्कराचार्य अंतराळ अनुप्रयोग आणि भू - सूचना संस्थेच्या माध्यमातून विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन केंद्र (एमआरसॅक) च्या सहकार्याने अतिक्रमणाच्याबाबत अलर्ट देणारी यंत्रणा निर्माण करावी. ही कार्यप्रणाली कांदळवन अतिक्रमणबाबतही लागू करावी. अशी यंत्रणा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असावी. अशा यंत्रणेमुळे अतिक्रमण करण्यास अटकाव करता येणे शक्य होईल. ही संगणकीय प्रणाली पीएम गतिशक्ती पोर्टलशी संलग्न असावी. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रासाठी अशी यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

### - जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (२४ जानेवारी २०२१ पर्यंत सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ - ३ मधील एच/प विभागातील ०१ प्रस्ताव आणि के/पूर्व विभागातील ०२ प्रस्ताव असे एकूण ०३ प्रस्तावास मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, वृक्ष प्राधिकरण समिती यांच्याकडे झाडे काढण्यासाठी परवानगी मिळावी याकरीता प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे | पुनर्रोपित करणेबाबतचे तपशील हे महानगरपालिकेच्या https://mcgm.gov.in या संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी --> विभाग आणि खाते --> खातेनिहाय माहिती पुस्तिका --> उद्याने व वृक्ष प्राधिकरण- कागदपत्रे --> वृक्ष प्राधिकरण जाहिर सूचना ७ दिवस ३९३ --> Zone- ||| या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्तप्रस्तावांविषयीनागरीकांच्याकाहीआक्षेपवासूचनाआसल्याससदरजाहीरात प्रसिध्दझाल्यापासून०७दिवसांच्याआतलेखीस्वरूपातविहितनमुन्यात(Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालशत सादर कराव्यात, तसेच आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमून्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in या ई-मेलवरीही नोंदवू शकतात .

विहित मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सुचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई- मेलद्वारे सुचना / आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहू शकता, सदर सुचना /आक्षेपाबाबतची सुनावणी दि. २५/०६/२०२५ रोजी उद्यान अधिक्षक कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.०० वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,**
**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,**
**वीरमाता जिजाबाई भोसले उदयान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, इम्बोल्ट पेग्विन कक्ष**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व) मुंबई- ४०० ०२७.**
**दुरध्वनी क्र. २३७४२१६२ E.mail – dysg.ta@mcgm.gov.in**

**सही/-**
**उद्यान अधिक्षक**
**व वृक्ष अधिकारी**

**पीआरओ/६७९/जाहि./२०२५-२६**

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा


# 'पॉटहोल क्विकफिक्स' अॅप आणि WhatsApp चॅटबॉट सेवा सुरू

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**




मुंबईमध्ये पावसाळा सुरू होताच रस्त्यांवर खड्ड्यांची समस्या उग्र होते. या समस्येवर जलद आणि प्रभावी उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेने एक अत्याधुनिक डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. 'पॉटहोल क्विकफिक्स' नावाचं अॅप आणि व्हॉट्सअॅप चॅटबॉट सेवा (क्रमांक: ८९९९२२८९९९) यांचा वापर करून नागरिक आता रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार सहज करू शकतात.

या अॅपच्या माध्यमातून खड्ड्यांचे छायाचित्र, त्याचे स्थान आणि वर्णन अपलोड करून केवळ पाच क्लीकमध्ये तक्रार नोंदवता येते. ही तक्रार थेट संबंधित विभागाला पाठवली जाते, त्यामुळे दुरुस्तीची प्रक्रिया त्वरीत सुरू होते. अॅप Android आणि iOS या दोन्ही प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. नागरिक या अॅपचा वापर सहजरीत्या करू शकतात, कारण ते वापरकर्त्यांसाठी अनुकूल (User-Friendly) डिझाइन करण्यात आले आहे.

व्हॉट्सअॅपवर 'Pothole' किंवा 'PT' (इंग्रजीमध्ये), तसेच 'खड्डा' किंवा 'ख' (मराठीत) असे कीवर्ड वापरून तक्रार नोंदवता येते. ही सेवा सुरू करण्यामागचा उद्देश म्हणजे अधिकाधिक नागरिकांना सहजपणे तक्रार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

या डिजिटल सुविधेची सुरुवात ९ जून २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्त व प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाखाली रस्ते व वाहतूक विभागाने खड्डे शोधणे आणि दुरुस्त करणे हे काम मोठ्या प्रमाणावर सुरू केले आहे.

'पॉटहोल क्विकफिक्स' अॅपमधून नोंदवलेल्या तक्रारी स्वयंचलितपणे संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतात. त्यानंतर ४८ तासांच्या आत त्या तक्रारीवर कारवाई करण्याचे निर्देश आहेत. जर कारवाई वेळेत झाली नाही, तर ती माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पाठवली जाते. यामुळे प्रशासनाची जबाबदारी सुनिश्चित होते.

अॅपमध्ये तक्रारीची स्थिती पाहण्याची, दुरुस्तीची अपेक्षित वेळ जाणून घेण्याची आणि काम पूर्ण झाल्यानंतर अभिप्राय देण्याची सुविधाही उपलब्ध आहे. तक्रारदार समाधान नसेल, तर तक्रार पुन्हा उघडण्याचा पर्यायही दिला जातो.

महापालिकेचा 'पॉटहोल क्विकफिक्स' अॅप आणि WhatsApp चॅटबॉट सेवा खड्ड्यांच्या समस्येवर एक स्मार्ट, पारदर्शक आणि सहभागी उपाययोजना ठरते. नागरिकांची सक्रिय भूमिका आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे मुंबईतील रस्त्यांची स्थिती लवकरच सुधारण्याची आशा निर्माण झाली आहे.

सकाळी सकाळी सर्वजण, आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले विचार घेवून अनेकजण लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फलाइट १७१ मध्ये चढले. अनेकांनी सेल्फी काढला, नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास. पण ते कधीच पोहोचले नाहीत. विमान कोसळले. अपवाद वगळता कोणीही वाचले नाही. काही क्षणांत, आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. या विमानातील आई वडील आणि त्यांच्या तीन मुलांनी विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी अवघ्या देशवासीयांना दु:ख देऊन गेली. त्यांनी घेतलेला आनंद त्यांच्या पाच जणांच्या सुखी परिवारावर कधी दु:खाचा डोंगर घेऊन आला, त्यांनाही समजले नसावे. कारण पुढील काही मिनिटातचं होत्याचं नव्हतं झालं होतं. शेवटी नियतीला आपण आव्हान करू शकत नाही, नियती श्रेष्ठ आहे. कारण आयुष्य क्षणभंगुर आहे. लंडनच्या दिशेने निघालेले विमान धावपट्टीवर सरकत होतं. खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेली माणसं कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं, पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती, "पोहोचल्यावर फोन करतो.. वाट पाहू नकोस." कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला शेवटचा फोटो पाठवला. कुणी ऑफिसच्या ग्रुपवर “Take off ??” असा मेसेज टाकला.. आणि कुणीतरी मनातल्या मनात एक प्रार्थना केली "सगळं नीट होऊ दे." पण त्या क्षणात, काळाने आपली योजना आखली होती.? एक मोठा आवाज, आगीचे ज्वाळा आणि एका क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळं सगळं जागेवर होतंङ्क फक्त माणसं नव्हती. उरली फक्त धूर, राख, आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर. अनेकांनी पाठविलेले त्या फोनवरचे शेवटचे मेसेज अजूनही वाचले गेले नाहीत. "Call me when you land..." "Miss you already..."Take care..."? कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं, कुठे फोन कट झाल्यावर अजूनही “Hello… Hello?” म्हणणारा कोणी तरी. कोणीच ठरवत नाही की शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल, शेवटचा शब्द कोणता असेल. आज जे गेले, त्यांच्या हसण्याच्या प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहेत. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगतं, "आयुष्य क्षणभंगुर आहे". माणसाचे जीवन कधी कुठे जाईल याचा भरोसा नसतो. साधे उदाहरण घेवू या. रमेश विश्वास कुमार एक भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत, जे अहमदाबाद विमान अपघातातून वाचले. ते सीट क्र.11अ मध्ये बसले होते. त्यांनी सांगितले की, विमान उड्डाणानंतर 30 सेकंदात पडताना त्यांनी स्वत: पाहिले. त्यांच्या आजूबाजूला अनेक मृतदेह होते, अशा अवस्थेत ते स्वत: चालत एम्ब्युलन्सकडे पोहोचले. ते भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत. ते वीस वर्षांपासून लंडनमध्ये राहतात आणि त्यांची पत्नी आणि मुलगा देखील तेथेच राहतात. रमेश विश्वास कुमार या घटनेतून वाचले, हे एक आश्चर्यकारक आणि भावनिक सत्य आहे. तर दुसरीकडे अहमदाबाद विमान अपघातात राजस्थानच्या संपूर्ण जोशी कुटुंबाला आपला जीव गमवावा लागला आहे. प्रदीप जोशी ही व्यक्ती सहा महिन्या पूर्वीच लंडनला शिफ्ट झाली होती. त्याची पत्नी कोमी व्यास हिला उदयपूरला चांगला जॉब होता. परंतु मुलांसाठी तिने लंडनला पती सोबत शिफ्ट होण्याचा निर्णय घेतला. या दोघांना एक मुलगी व दोन जुळे मुले होते. लंडनला निघण्यापूर्वी त्यांनी एक सेल्फी देखील काढली. परंतु हीच सेल्फी शेवटची ठरली.







# विमानातील शेवटची सेल्फी!



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

विमानात बसलेल्या 242 प्रवासी आणि 12 क्रू मेंबर्स यांनी दुपारी 1:38 वाजता टेकऑफ केले आणि पाच मिनिटांतच अपघात झाला. अपघातानंतर विमानाला आग लागली आणि घटनास्थळावरून दाट काळा धूर निघाला. सोशल मीडियावर त्याचे व्हिडीओ आणि फोटो व्हायरल झाले.

विमानाच्या टेलचा भाग तुटल्याने हा अपघात झाला असावा, पण याबाबत अधिकृत पुष्टी बाकी आहे. सात फायर टेंडर्स आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्यावर बचाव कार्य सतत सुरू झाले होते. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांचाही या अपघातात मृत्यू झाला. या विमान दुर्घटनेतील व्हिडिओ समोर आले अन् अनेकांच्या काळजाचे ठोके चुकले.

242 प्रवाशांसह अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन लंडनसाठी उड्डाण घेतलेलं विमान अवघ्या सात मिनिटांत खाली कोसळलं. विमान दुर्घटनेचे वृत्त समोर येताच विमानातील प्रवाशांसाठी प्रार्थना होऊ लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने व बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीला सुरुवात केली. मात्र, दुर्घटनेचा व्हिडिओ पाहून मनात जी शंका न राहून होती होती, अखेर तेच घडलं.

विमानातील 242 प्रवाशांपैकी एकजण वगळता सर्वांचाच या दुर्घटनेत मृत्यू झाला. एअर इंडियाच्या दुर्घटनाग्रस्त विमानातील एकूण 242 प्रवाशांमध्ये 169 भारतीय प्रवासी, 53 ब्रिटीश नागरिक, पोतुर्गालचे सात आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत होते. दुर्घटनेनंतर विमानातील प्रवाशांच्या नातेवाईकांनी घटनास्थळावर धाव घेतली. जवळील रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळत आहे.

या दुर्घटनेनं अवघा देश शोकसागरात बुडाला आहे. विशेष म्हणजे विमानाचा अपघात इतका भयंकर होता की, अहमदाबादच्या बी.जे. मेडिकल कॉलेजच्या इमारतीवर हे विमान कोसळलं. तेथील हॉस्टेलवर जेवण करणाऱ्या भावी डॉक्टरांना भरल्या ताटावरुन उठवण्याचं काम ह्या दुर्घटनेनं केलं. विमानामध्ये चढणाऱ्या माणसांच्या हातात विमानाचे तिकीट असतं. पण परतीचं आयुष्य हातात नसतं. नोकरी व्यवसाय करणाऱ्या अनेकांच्या जीवनात वेगवेगळे प्रसंग असतात. कोणीतरी पावसात भिजत ऑफिसला जातं, कोणीतरी बुटाच्या आत भिजलेले पाय घेऊन रोज अनेक वाहने बदलतो. कोणीतरी रात्री उशिरा घरी पोहचतो, पण सकाळी मात्र वेळेआधीच कामाच्या दिशेने पळायला लागतो. हे सर्व कुठल्यातरी "स्वप्नासाठी" चाललेले असतं. स्वतःचं नव्हेङ्क घरच्यांचं.

विशेषतः आपल्या बाळांचं, आपल्या बायकोचं, आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांचं! आता जे अपघातात गेले, ते फक्त प्रवासी नव्हते, ते कोणाचे बाबा होते, कोणाचा जीवनसाथी, कोणाचा मुलगा, कोणाचे भाऊ, बहीण होते. त्यांनी त्या दिवशीही नेहमीसारखंच विमानामध्ये चढायचं ठरवलं असेल, विमानात बसतांना मनात काही विचार असतील "आज लंडनला पोहोचताच आई बाबांशी चर्चा करायची आहे.. आज लेकासाठी काही खरेदी करायची आहे..." "आज बायकोला म्हटलंय वेळेवर पोहोचतोय "पण नियतीनं त्यांच्या तिकीटावर फक्त 'एक मार्गचं' लिहून ठेवला होता.

त्या विमानात प्रवास करणाऱ्या प्रत्येक माणसामागे एक घर असतं... एक स्वप्न असतं.... एक जबाबदारी असते. तो प्रवासी विमानातून पडतो, तेव्हा केवळ एक देह संपत नाही, तर एका घरातील उजेड संपतो, एका बाळाच्या डोळ्यातून बापाचा चेहरा हरवतो, आईची माया हरपते, घरचा कर्ता मुलगा जातो..

विचार करा की, किती बापांच्या खिशात जीवन जगण्याइतकं भांडवल असेल? कितीजण कामाची यादी उराशी घेऊन चालले होते? किती जणांना घरातल्या आजारी आईच्या औषधांची आठवण होती?

आपण अपघाताची बातमी पाहून दोन मिनिटांनी आपापल्या कामात व्यस्त होतो. पण ज्या घराने आपला माणूस गमावला असतो, त्यांचं आयुष्य पुढे स्टॉप होतं. एकाएकी त्या घरात जेवण जरी शिजलं तरी भूक राहत नाही... बाळाला बाबाच्या खांद्यावर बसायचं असतं, पण आता फोटोवर हार टांगून 'बाबा कुठे गेले?' असा निरागस प्रश्न तो विचारतो...

आज एकदा मनाशी विचार करा जे गेले, ते गेलंच.... पण आपल्या भोवती अशा हजारो लोकांना संघर्ष करावाच लागतो. जे दररोज घराच्या सुखासाठी, फुलपाखरांसारख्या बाळाच्या हसण्यासाठी, आईच्या औषधासाठी आणि बायकोच्या स्वप्नांसाठी आपलं सर्वस्व देत चालले होते. त्या प्रत्येक माणसात एक 'बाप' एक 'मुलगा' आहे, एक कमावता हात आहे, एक 'स्वप्नांचा रक्षक' आहे.

■ ■ ■

## राज ठाकरेंनी घेतलेले काही आक्षेप

बोईंगच्या 'ड्रीमलाईनर' विमानाबद्दल खूप तक्रारी होत्या. २०१३ ला पहिल्यांदा जपान एअरलाईन्सच्या विमानाला आग लागली होती. त्यानंतर या विमानाबद्दल अनेक तक्रारी येतच होत्या. त्या इतक्या होत्या की २०२० ते २०२३ या काळात अनेकदा या विमानांच उड्डाण थांबवलं गेलं होतं. जानेवारी २०१३ ला तर अमेरिकेपासून युरोपपर्यंत जवळपास सगळ्या मोठ्या विमान प्राधिकरणांनी जवळपास ३ महिने बोईंग ड्रीमलाईनरचं उड्डाण खंडित केलं होतं. २०१३ ला भारतात डीजीसीएने देखील काही काळासाठी या विमानाचं उड्डाण खंडित केलं होतं. जर ड्रीमलाईनर बद्दल इतक्या तक्रारी आहेत हे माहित असून सुद्धा आपण ही विमानं का वापरू देत होतो ? डीजीसीएने यावर कधीच कोणती कारवाई का नाही केली ? हे विमान २८ जानेवारी २०१४ ला एअर इंडियाच्या सेवेत आलं. थोडक्यात जगभरात जेंव्हा ड्रीमलाईनरबद्दल तक्रारी होत्या त्याच दरम्यान आपण हे विमान ताफ्यात आणलं. ड्रीमलाईनरची सेवा २०२० ते २०२३ च्या काळात अनेकदा जगभरात तांत्रिक कारणांमुळे खंडित झाल्याचा इतिहास असताना, एअर इंडियापासून अनेक विमान कंपन्यांनी ४० हुन अधिक ड्रीमलायनर विमानांची ऑर्डर दिली आणि या सगळ्याला सरकारने परवानगी का दिली? डीजीसीएने इतका पण विचार का नाही केला? ड्रीमलाईनर्स जर मृत्यूचा सापळा बनणार असतील तर कुठलाही दबाव न सहन करता याची सेवा खंडित करावी आणि आधीची ऑर्डर रद्द केली पाहीजे. याविषयी न्यूयॉर्क टाइम्स, वॉलस्ट्रीट जर्नल, अल-जझीरा यामध्ये छापून आलं आहे. अल-जझीराने तर ड्रीमलायनरबद्दल एक डॉक्युमेंट्री पण केली आहे.

## मृत्यूला कवटाळतांनाची स्थितप्रज्ञता

पायलट सुमित सभरवाल यांची त्यांना मिळालेल्या ४० सेकंदातली समय सूचकता दाखविली, अशी माहीती हाती आली आहे. संकटाच्या काळात, एखादा महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या स्थितीत कधीच गडबडून न जाता मन स्थिर ठेवत स्थितप्रज्ञ, याचा अर्थ आजूबाजूच्या परिस्थितीचा आपल्या मनस्थितीवर कुठलाही एका टोकाचा परिणाम होऊ न देता मन मध्यबिंदूवर स्थिर करत आपण परिस्थितीशी मुकाबला केला पाहिजे व उद्भवलेल्या समस्येवर आलेल्या संकटावर उत्तमातला उत्तम पर्याय, सोल्युशन आउटपुट काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजेच आपण विचलित न होता स्थितप्रज्ञ अवस्थेत गेले पाहीजे. या दुर्घटनेतील मुंबई येथील पवईचे निवासी असलेले पायलट सुमित सभरवाल यांना जेव्हा लक्षात आलं की, आता विमान उंचीवर नेणे अशक्य आहे आणि 304 किमी प्रति तासाच्या वेगाने ते जमिनीकडे झेपावत आहे केवळ 600 ते 900 फुटाचे अंतर जमिनीशी विमानाच्या टकरावण्याचं बाकी असताना त्यांनी आजूबाजूला नजर फिरवत जिथे कमीत कमी डॅमेज होईल अशा ठिकाणी ते विमान वळवलं तिथे ते विमान पडलं. जर का पायलट सुमित सभरवाल घाबरून जाऊ हडबडाहट मध्ये या विमानालाला कुठेही, कसेही पडू दिलं असतं तर 25 हजार अशा अतिशय दाट लोक वस्तीवर हे विमान कोसळलं असतं मृत्यूचा आकडा भयानक राहिला असता.

● हेमंत (राजू) बिऱ्हाडे

# सर्वोत्कृष्ट लोककलावंत प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे

**मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांना,आज दिनांक १४ जून २०२५ रोजी अखिल भारतीय नाट्य परिषदेचा , अत्यंत प्रतिष्ठित असा "सर्वोत्कृष्ट लोककलावंत" हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. या निमित्ताने त्यांच्या जीवनाचा आणि कलेचा घेतलेला हा वेध.**

---------------

देवेंद्र भुजबळ
९८६९५८४८००.

---------------



बऱ्याचशा व्यक्ती एखाद्या विशिष्ट पदावर पोहोचल्या की,आपल्यातील कला जाहीरपणे सादर करण्यास कचरतात. कारण त्यांना बहुधा असे वाटत असावे की,मी आता कलाकारापेक्षा वरच्या श्रेणीत आलो आहे,त्यामुळे कला सादर करण्याची त्यांना लाज वाटत असावी. इथे मी संचालक राहिलेल्या आमच्या माहिती खात्याचेही उदाहरण देता येईल. पूर्वाश्रमीचे पत्रकार राहिलेले बरेच जण "अधिकारी" झाले की, त्यांना बातम्या, लेख लिहिणे हे जणू कमीपणाचे काम वाटते. तर दूरचित्रवाणी वाहिन्यांतून अनुभव घेऊन आलेल्यांना, ते वाहिनीत जे काम करायचे ते म्हणजे वृत्त चित्रकथा तयार करण्याचे, तर ते काम करण्याची त्यांची "अधिकारी " झाले की इच्छाच रहात नाही! खरं म्हणजे, त्यांच्या अनुभवांमुळे, गुणवत्तेमुळेच त्यांची निवड करण्यात आलेली असते आणि तसेच काम ते माहिती खात्यात आले की,अजून जोमाने करतील, अशी अपेक्षा असते.पण ते बऱ्याचदा होताना दिसत नाही.

म्हणूनच अशा या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख प्रा डॉ गणेश चंदनशिवे हे विद्यापीठाच्या पारंपरिक प्राध्यापकाच्या प्रतिमेला छेद देत सतत स्वतःची कला सादर करण्याबरोबर ईतर लोक कलावतांना पुढे आणण्यात, त्यांना मदत करण्यात नेहमी पुढे असतात,ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद येथे ५ जुलै १९७७ रोजी एका शेतकरी कुटुंबात गणेश चंदनशिवें यांचा जन्म झाला. जाफराबाद येथीलच सिद्धार्थ महाविद्यालयातुन ते बी ए झाले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून नाट्यशास्त्र पदवी प्राप्त केली.

त्यांचा ऐच्छिक विषय होता लोककला साहित्य. तर लोक रंगभूमीवरील तमाशा सादरीकरणाचं बदलतं स्वरूपः एक चिकित्सक अभ्यास या विषयावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून त्यांनी पीएचडी मिळवली. त्यानंतर एम जे कॉलेज, जळगाव येथे नाट्यशास्त्र विभागात त्यांची २००३ साली हंगामी सहाय्यक प्राध्यापक पदी तर पुढच्या वर्षी के. एस. के. महाविद्यालय, बीड येथे नाट्यशास्त्र विभागात हंगामी सहाय्यक प्राध्यापक पदी नियुक्ती झाली. ते जानेवारी २००६ पासून मुंबई विद्यापीठ लोककला अकादमीत सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. यथावकाश ते विभाग प्रमुखही झाले.

गणेश चंदनशिवें यांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर अनेक शोध प्रबंध सादर केले आहेत. विविध कार्यशाळेत भाग घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व तमाशा रंगभूमी वाटचाल : एक चिकित्सक अभ्यास हा संशोधन प्रकल्प त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केला.

भारत सरकारच्या नागपूर येथील दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्रात तमाशा वगनाट्यह्न हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला. २००८ साली झालेल्या अखिल भारतीय लोककला संमेलनात संत साहित्यात महिलांचे योगदान राज्यस्तरीय संशोधन परिषद, दयानंद महाविद्यालय, लातूर येथे लोककलेचे अंतरंग हा शोधनिबंध, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध, ऑगस्ट २०१२ मध्ये अखिल भारतीय महिला लोककला संमेलनात लोककलेत महिलांचे योगदान हा शोध निबंध, एस पी विद्यापीठ, गुजरात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात भारतीय लोकनाट्य या विषयात शोधनिबंध, २०१४ साली गुजराती लोक साहित्य विभाग यांनी एन.एस. पटेल आर्ट्स कॉलेज आनंद गुजरात येथे आयोजित केलेल्या भारतीय लोकसाहित्य परिषदेत शोधनिबंध, आय.आय. ए .एस. सिमला आयोजित मिथक एक अनुशीलन या विषयावर राष्ट्रीय शोधनिबंध, जून २०१६ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत शोध निबंध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेत फंडामेंटल हुक आर्ट्स या विषयावर शोध निबंध, ऑक्सफोर्ड विद्यापीठ, लंडन येथे २०१६ साली लोककलेच्या माध्यमातून आदिवासी जनजाती शिक्षणाचे महत्त्व या विषयावर शोधनिबंध, त्याच वर्षी एन. आय. एस. एस. आणि लोक साहित्य संशोधन केंद्र, भारत सरकार आयोजित आंतरशाखीय संस्कृती संशोधन परिषदेत शोधनिबंध, जानेवारी २०१८ मध्ये तमाशा-एक रांगडा खेळ डिंपल प्रकाशन, मुंबई प्रकाशित हा संशोधनपर ग्रंथ, संगीत नाटक अकादमी, या शिवाय नवी दिल्ली आयोजित भक्ती समर्पण राष्ट्रीय परिषदेतही त्यांनी शोधनिबंध सादर केला आहे.

आदिवासी रंग महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय परिषदेत आदिवासी समाजाचे वर्तमान या विषयावर २०१८ मध्ये शोध निबंध असं त्यांचं सातत्याने संशोधन कार्य सुरू आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील गावांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी कानडी मराठी मध्ये तमाशा सादर केला.

राजस्थान इंटरनॅशनल सेंटर मध्ये नुकताच त्यांनी तमाशा सादर केला . या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले राजस्थान चे महामहिम राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. लवकरच "महाराष्ट्राची लोककला " सातसमुद्रापलीकडे, अमेरिकेत पोहोचविण्यासाठी आघाडीचे गायक शंकर महादेवन यांच्या समवेत डॉ. चंदनशिवे यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. त्याबद्दल सर्व लोक कलावंत आणि विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

स्वतः खरेखुरे लोक कलावंत असलेले प्रा डॉ चंदनशिवे यांनी केवळ स्वतःची कला, व्याख्याने,कार्यशाळा यातूनच लोक कलावंत घडावेत यासाठी स्वतःला मर्यादित ठेवले नसून लोक कलावंत घडावेत,ते उभे रहावेत यासाठी ते हर प्रकारे झटत असतात.

कोरोनाच्या भयंकर काळात लोकांसमोर आपली कला पेश करणाऱ्या कलावंत मंडळींना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावं लागत होते. अशा कठीण परिस्थितीत त्यांना केवळ धीर देण्याचंच काम न करता वेळ प्रसंगी स्वतः पदरमोड करून त्यांनी अनेक लोक कलावंतांना मदत केली आहे, यावरूनच त्यांची या कलावंतांविषयीची तळमळ दिसून येते. त्यांची ही तळमळ बघून तर माझा त्यांच्या विषयीचा आदर शतपटीने वाढला.

चंदनशिवे सर विविध विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर आहेत. मध्य प्रदेशातील हरिसिंग गौर विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विभागाच्या नाट्यशास्त्र विभाग सल्लागार समितीचे सदस्य, बोर्ड ऑफ स्टडीज, लोककला अकादमी मुंबई विद्यापीठ सदस्य, सहाय्यक अधिष्ठाता परफॉर्मिंग अँड फाइन आर्ट्स मुंबई विद्यापीठ, सल्लागार सदस्य, मराठी भाषा समिती महाराष्ट्र शासन सदस्य म्हणून योगदान देत आहेत.

अध्ययन, अध्यापन, संशोधन या बरोबरच चंदनशिवे सरांचा व्यावसायिक सहभाग मोठा आहे. गर्जा महाराष्ट्र माझा हा माहितीपट, ढोलकीच्या तालावर हा ई. टीव्ही वाहिनी वर रियालिटी शो, मराठी जागर देवीचा आयबीएन लोकमत, हसत खेळत सिरीयल, सह्याद्री वाहिनीच्या डीडी १० वर धिना धिन मुलाखत, अनुराग कश्यप दिग्दर्शित हिंदी चित्रपट शैतान मध्ये "पिंट्याची हंडी फुटली" हे गाणे, संजय लीला भंसाली दिग्दर्शित बाजीराव मस्तानी चित्रपटातील गाणे त्यांनी गायले आहे.

बाळकडू, शौर्य, मस्का, बया रुद्र या चित्रपटांसाठी पार्श्वगायन, हृदयनाथ चित्रपटासाठी गोंधळ गीत, शंकर महादेवन यांच्या समवेत अल्बम, झाकीर हुसेन आणि शंकर महादेवन यांच्यासमवेत संगीत मैफल, तोफिक कुरेशी द फॉरेस्ट अल्बम मध्ये सहभाग, तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या उपस्थितीत झालेल्या आठव्या आंतरराष्ट्रीय रंगमंच ऑलम्पिक मध्ये लाल किल्ल्यावर लोककला सादरीकरण, एबीपी माझा वाहिनीच्या माझा कट्टा या सदरात एक तासाची प्रकट मुलाखत, जय महाराष्ट्र वाहिनीवर मुलाखत, अस्सल पाहुणे- इरसाल नमुने या कलर्स मराठी वाहिनीवरील मालिकेत प्रकट मुलाखत, "चला हवा येऊ द्या" या झी मराठी वाहिनीवर महाराष्ट्राची लोककला हा कार्यक्रम, भारत सरकारच्या संस्थेद्वारे संजारी फेस्टिवल मध्ये महाराष्ट्राच्या लोक परंपरेवर सांस्कृतिक कार्यक्रम असा त्यांचा फार मोठा आविष्कार आहे.

विच्छा माझी पुरी करा, गाढवाचे लग्न,तीन पैशाचा तमाशा, जांभूळ आख्यान, खंडोबाचे लगीन, गोष्ट अकलेची, पुढारी पाहिजे, गावची जत्रा पुढारी सतरा या मराठी लोक नाट्यात त्यांचा सहभाग राहिला आहे.

चंदनशिवे सरांनी एआययु द्वारे जबलपूर येथे विनोदी अभिनय या कला प्रकारात सहभाग घेऊन सुवर्णपदक प्राप्त केले आहे. राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत तुळजापूर महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि दिग्दर्शक पुरस्कार, राज्यस्तरीय कंटक सेवाभावी संस्था परभणी, कलारत्न पुरस्कार, राज्यस्तरीय शाहू फुले आंबेडकर जयंती उत्सव समिती जाफराबादतर्फे समाजभूषण पुरस्कार, भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पातळीवरील उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कार, अखिल भारतीय नाट्य परिषद बोरीवली कलारंग पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे फाउंडेशन पुणे द्वारा कलारत्न पुरस्कार, राज्यस्तरीय बालगंधर्व परिवार पुणे द्वारा लोक गंधर्व पुरस्कार, अण्णाभाऊ साठे संयुक्त जयंती उत्सव समिती कल्याण द्वारा साहित्य रत्न पुरस्कार, एकता कल्चरल फाउंडेशनचा विठ्ठल उमप स्मृति लोकरंग पुरस्कार, यशवंत प्रतिष्ठान, अंबड जालना येथील राज्यस्तरीय यशवंत पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत. आपल्या या नेत्रदीपक वाटचालीचे श्रेय चंदनशिवे सर त्यांचे आईवडील, सर्व गुरुजन, सहकलाकार आणि त्यांच्या पत्नीला देतात.

स्वतः पुरतंच जगण्याच्या आजच्या काळात प्राध्यापक डॉक्टर गणेश चंदनशिवे सर लोक कला, लोक कलाकार यांच्या प्रगतीसाठी झटत आहेत, हे त्यांचं अतिशय महत्त्वाचं योगदान आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.



# रक्तदाब, स्मरणशक्ती तसेच साखर नियंत्रित करण्यास उपयुक्त मसाले

मसाल्यांचे भारताशी शतकानुशतके जुने नाते आहे. शाही जीरा ते दालचिनीपर्यंत, देशात अशा अनेक हर्ब्स किंवा मसाले आहेत जे वर्षानुवर्षे अन्नाची चव द्विगुणित करण्यास मदत करत आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का की जर आरोग्याची काळजी घेण्यासाठी या मसाल्यांचे सेवन केले तर कमी वेळातच तुम्हाला उत्तम परिणाम मिळू शकतात.

अनेक संशोधनांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की हे काही ठराविक मसाले केवळ आपल्या आतड्यांचे आरोग्य सुधारत नाहीत तर मधुमेह असलेल्या रूग्णासांसाठी त्याच्या शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यापासून ते स्मरणशक्ती वाढवण्यापर्यंत अनेक फायदे प्रदान करतात.

**दालचिनी :** दररोज दालचिनीला आहाराचा भाग बनवले तर ते शरीरातील रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. म्हणूनच, मधुमेहाच्या रुग्णांसाठी ते औषधापेक्षा कमी नाही. ज्यांना मधुमेहापूर्वीची लक्षणे आहेत त्यांनी दररोज अर्धा चमचा दालचिनी पावडर नक्कीच खावी. महिनाभर असे केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहील.


**हळद ;** हळद केवळ आपल्या पदार्थांचा रंगच वाढवत नाही तर त्याचे अँटीसेप्टिक आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचा घटक असतो जो जळजळ कमी करण्यास मदत करतो. दररोज ४ ग्रॅम हळद भाज्यांसोबत किंवा रिकाम्या पोटी पाण्यात मिसळून पिण्याचे अनेक फायदे आहेत.

**अदरक :** असे आढळून आले आहे की ते गर्भधारणेदरम्यान आणि केमोथेरपी दरम्यान मळमळण्याच्या समस्येला कमी करण्यास मदत करते. जर तुम्ही ताजे अदरक वापरत असाल तर ते सोलण्याची गरज नाही.

**लवंग :** हे दातदुखी कमी करण्यास देखील मदत करते. तर लवंग जेल हे 20 टक्के जास्त प्रभावी आहे. लवंगामध्ये आढळणारे युजेनॉल नैसर्गिक वेदनाशामक म्हणून काम करते. ● ● ●

अशोकायन

प्रा. अशोक सारडा मेहकर
(९४२१३९४३३९)



## रक्तदान

आपले रक्त आले
गरजवंताच्या कामी
तर मिळते त्या
व्यक्तिला जीवदान...

ही उदात्त भावना
असेल मनी तर
स्वयंस्फूर्तीने
केले जाते रक्तदान...

जात पात धर्म पंथ
'रक्त ' भेद करीत नाही
मानवता धर्मच सर्वश्रेष्ठ
हा संदेश आपणास देई!

# इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) नागपूर विभागाने बदामांच्या आरोग्यदायी फायद्यांवर घेतले शैक्षणिक सत्र




**नागपूर, १३ जून :** इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) च्या नागपूर विभागाने अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया यांच्या सहकार्याने शहरातील हॉटेल सेंटर पॉइंट येथे आहारतज्ञ आणि न्यूट्रिशन प्रोफेशनल्ससाठी एक शैक्षणिक सत्र आयोजित केले. या सत्राचा उद्देश बदामांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि दैनंदिन आहारात बदामांचा समावेश केल्यास मिळणारे आरोग्यदायी फायदे सर्वांपर्यंत पोहोचवणे हा होता.

हे सत्र न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी हृदयविकार आणि मेटाबोलिक आरोग्य, स्नायूंना होणारे फायदे आणि रक्तातील साखरेचे नियमन या विषयांवर झालेल्या तीन महत्त्वपूर्ण संशोधनांचा आढावा घेतला. यानंतर झालेल्या पॅनल चर्चेमध्ये श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्यासोबत डॉ. कविता गुप्ता (सचिव, आयडीए नागपूर विभाग) आणि डॉ. रेनुका माईंदे (कोषाध्यक्ष, आयडीए नागपूर विभाग) सहभागी झाल्या होत्या. डॉ. कविता बक्षी (संयोजिका, आयडीए नागपूर विभाग) यांनी चर्चा सत्राचे सूत्रसंचालन केले.

या चर्चेसाठी आवश्यक संशोधन अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने प्रायोजित केले होते. या संशोधनामध्ये पाउला आर ट्रूम्बो, जेमी अर्ड, फ्रान्स बेलिस्ले, अ‍ॅडम ड्रेवनोव्स्की, जॅक ए गिल्बर्ट, रोनाल्ड क्लेनमन, अनुप मिश्रा, जॉन सिव्हनपिपर, माहा ताहीरी, कॅरोल ई वॉटसन, जेम्स हिल, मार्क कर्न, विश्वनाथन मोहन आणि सुधा वासुदेवन या नामवंत आहारतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी योगदान दिले. त्यांच्या अभ्यासातून हे निष्पन्न झाले की दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्याने आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.

या कार्यक्रमात श्रीमती शीला कृष्णस्वामी यांनी करंट डेव्हलोपमेंट्स इन न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित झालेल्या तज्ज्ञांच्या अभ्यासांवर आधारित माहिती दिली. त्यानुसार दररोज बदाम खाल्ल्याने एलडीएल (बॅड कोलेस्ट्रॉल) कमी होण्यास मदत होते आणि डायास्टोलिक ब्लड प्रेशर थोडकं कमी होते जे दोन्हीही हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे आणि त्याचा वजनावर कुठलाही वाईट परिणाम होत नाही. विशेषतः प्रीडायबेटिस असलेल्या भारतीयांमध्ये बदाम सेवनामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले राहते.

कृष्णस्वामी म्हणाल्या, दररोज मूठभर बदाम खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. बॅड कोलेस्ट्रॉल कमी होतो, थोडक्यात रक्तदाबही कमी होतो आणि वजन वाढत नाही. काही लोकांचे वजन थोडं कमीही होऊ शकतं आणि त्यांचे ब्लड शुगर लेव्हल चांगले नियंत्रित राहू शकतात. हा आरोग्याची काळजी घेण्याचा एक सोपा आणि चविष्ट मार्ग आहे.



यशस्वी महिला मंडळ तर्फे वटपौर्णिमाचा सण पारंपरिक रीतीने साजरा करण्यातआला. पुरातन चमत्कारी हनुमान मंदिर मधे आठ वर्षा आधी आम्ही एक छोटेसे वडाचे रोपट लावले. आज इतका मोठा वट वृक्ष झाला. विशेष म्हणजे आता महिला वर्ग मोठ्या संख्येने पूजा करायला यायला लागलेत यशस्वी महिला मंडळ नेहमीच असेच संस्कृती जपणारे उपक्रम राबवत राहतात. यशस्वी महिला मंडळ ची अध्यक्ष सौ नीरजा पाटील.

## स्टेबल मनी या ऑनलाइन एफडी बुकिंग व्यासपीठाने इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलकेणी यांच्या फंडामेंटम पार्टनरशीपमधून मिळवला १७३ कोटी रुपयांचा निधी

**नागपूर, १२ जून :** स्टेबल मनी या भारतातील पहिल्या डिजिटल फिक्स्ड डिपॉझिट गुंतवणूक व्यासपीठाच्या वेल्थटेक व्यासपीठाने सीरिज बी फंडिंग फेरीत १७३ कोटी रुपयांचा निधी मिळवला आहे. इन्फोसिसचे सहसंस्थापक आणि आधारचे निर्माणकर्ते नंदन निलकेनी सहसंस्थापक असलेल्या फंडामेंटम पार्टनरशीपतर्फे ही फेरी आयोजित करण्यात आली. यात ४७, आरटीपी ग्लोबल आणि लाइटस्पीड अशा आधीपासूनच्या गुंतवणूकदारांसह आदित्य बिर्ला वेंचर्सही सहभागी झाले होते. या व्यासपीठाच्या धोरणांवर आणि दृष्टिकोनावर असलेला विश्वासच यातून प्रतित झाला आहे. स्टेबल मनीच्या मोठ्या सीरिज ए राऊंडनंतर अवघ्या दहा महिन्यांत मिळालेल्या या निधीमुळे स्थिर गतीने होणारी प्रगती आणि गुंतवणूकदारांचा विश्वास दिसून येतो.

स्टेबल मनीतर्फे फिक्स्ड इन्कम इन्व्हेस्टमेंट म्हणजेच निश्चित उत्पन्न गुंतवणूक पर्याय दिले जातात. यात फिक्स्ड डिपॉझिटवर ९.१ टक्क्यांपर्यंत व्याज मिळते, एफडी आणि स्टेबल बाँड्स (स्टेबल ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेड)चे सुरक्षित क्रेडिट कार्ड्स अशा सुविधाही यात आहे. वापरकर्त्यांना २०० हुन अधिक बँकांच्या एफडी व्याजदराची तुलना करता येईल, अवघ्या तीन मिनिटांपेक्षा कमी कालावधीत डिपॉझिट बुक करता येईल, ७ दिवसांची ट्रायल एफडी करता येईल आणि तात्काळ पैसे काढण्याची सोयही मिळवता येईल. शिवाय, हे सगळे करण्यासाठी कोणतेही बचत खाते किंवा सेविंग अकाऊंट असण्याची गरज नाही.

२०२२ मध्ये सुरुवात झाल्यापासून स्टेबल मनीने देशभरात २० लाखांहून अधिक वापरकर्ते मिळवले आहेत. शिवाय, त्यांची एकूण असेस अंडर मॅनेजमेंट म्हणजेच व्यवस्थापनाअंतर्गत मालमत्ता ३००० कोटी रु.वर पोहोचली आहे. सुरक्षित आणि अंदाज लावता येईल अशा परताव्यासाठी महाराष्ट्रात २.८ लाखांहून अधिक वापरकर्ते स्टेबल मनीवर विश्वास टाकतात.

फिक्स्ड डिपॉझिट म्हणजेच ठेवी हे भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह वित्तीय उत्पादन आहे. २३ करोड अधिक वापरकर्त्यांकडे सध्या ठेवी आहेत. ही बाजारपेठ वार्षिक १२ टक्के अशा स्थिर गतीने वाढते आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण इतकेच लक्षणीय आहे. ३.७ कोटींहून अधिक एफडी सध्या आहेत. आरबीआयच्या आकडेवारीनुसार ही ठेवींची एकूण रक्कम ३५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. मात्र, तरीही ही परिसंस्था बहूतांश ऑफलाइन आणि अकार्यक्षम आहे. भारतात जवळपास ९४ टक्के ठेवींवर ८ टक्क्यांहून कमी व्याज मिळते. यातून उपलब्धता आणि त्याबद्दलची सजगता यातील दरी अधोरेखित होते आणि स्टेबल मनी हीच दरी भरून काढण्याचा प्रयत्न करत आहे.

या समस्येवरील तोडगा म्हणून, स्टेबल मनी देशातील सर्वाधिक एफडी व्याजदरदेणाऱ्या अनेक आघाडीच्या लघुवित्त बँका, एनबीएफसी आणि इतर अनुसूचित व्यावसायिक बँकांसोबत भागीदारी करत आहे. सर्व ठेवी बचतखाते उघडण्याची आवश्यकता न ठेवता १००% डिजिटल पद्धतीने बुक केल्या जातात आणि रिझर्व्हबँकेची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या डीआयसीजीसीकडून प्रतिबँकप्रति वापरकर्ता छ५लाखांपर्यंत विमा संरक्षण मिळते.

त्याचबरोबर, स्टेबल बॉन्ड्स (स्टेबल ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेडद्वारे संचालित) सादर केल्याने आता गुंतवणूकदारअदानी, मुथूट आणि आयआयएफएल सारख्या आघाडीच्या कंपन्यांकडून सेबी-नियमितअल्प-मुदतीच्या आणि दीर्घकालीन बाँडमध्ये गुंतवणूक करू शकतात. या ठेवींची मर्यादा फक्त १,००० पासूनसुरू होते आणि त्यावर १२% पर्यंतपरतावामिळू शकतो.

स्थिर उत्पन्न गुंतवणुकीच्या मार्गाचे डिजिटायझेशन करून, स्टेबलमनी मुदत ठेवींमधील गुंतवणूकअधिक पारदर्शक आणि सुलभ बनवत आहे.

## इसुझू मोटर्स इंडियातर्फे देशभरात आय-केअर मान्सून सर्व्हिस कॅम्पचे आयोजन

**नागपूर, १३ जून :** इसुझूची सेवा आणि ओनरशिपचा अनुभव उत्कृष्ट ठेवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून, इसुझू मोटर्स इंडिया देशभरात इसुझू आय-केअर मान्सून कॅम्पचे आयोजन करणार आहे. इसुझू डी-मॅक्स पिकअप्स आणि एसयूव्ही श्रेणीसाठी असलेल्या या कॅम्पद्वारे, ग्राहकांना आकर्षक लाभ तसेच प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, जेणेकरून देशभरात या पावसाळ्यात विना-अडथळा ड्रायव्हिंगचा अनुभव मिळेल.

इसुझू केअर या उपक्रमाअंतर्गत हा मान्सून कॅम्प १६ ते २१ जून २०२५ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) सर्व इसुझू अधिकृत डीलर सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत ग्राहकांना त्यांच्या वाहनांसाठी खास ऑफर्स आणि फायदे मिळू शकतील.

हा मान्सून कॅम्प देशभरातील सर्व इसुझू अधिकृत सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये पुढील शहरांचा समावेश आहे : अहिल्यानगर, अहमदाबाद, अंबिकापूर, बेंगळुरू, बरेली, बाडमेर, बठिंडा, भांडूप, भोपाळ, भुवनेश्वर, बिकानेर, बिलासपूर, कालिकत, छत्रपती संभाजीनगर, चेन्नई, कोईम्बतूर, दिब्रूगढ, दीमापूर, दुर्गापूर, एर्नाकुलम, गांधीधाम, गोरखपूर, गुरगाव, गुवाहाटी, हिसार, हावडा, हुबळी, हैदराबाद, इंदूर, इटानगर, जयगाव, जयपूर, जालंधर, जम्मू, जोधपूर, कडप्पा, करनाल, खम्मम, कोल्हापूर, कोलकाता, कोट्टायम, कुर्नूल, लेह, लखनऊ, लुधियाना, मदुराई, मंडी, मंगळुरू, मेहसाणा, मोहाली, म्हैसूर, नागपूर, नाशिक, नेल्लूर, नेरुळ, नवी दिल्ली, नोएडा, पाटणा, पुणे, रायपूर, राजमुंद्री, राजकोट, रत्नागिरी, सातारा, शिवमोग्गा, सीकर, सिलिगुडी, सोलापूर, श्रीनगर, सूरत, त्रिशूर, तिरुनेलवेली, तिरुपती, त्रिची, तिरुअनंतपुरम, वडोदरा, विजयवाडा आणि विशाखापट्टणम.

ग्राहकांनी सर्व्हिस बुकिंगसाठी आपल्या जवळच्या इसुझू डीलरशी संपर्क साधवा किंवा https://www.isuzu.in/servicebooking.html या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ग्राहकांनी १८०० ४१९९ १८८ (टोल-फ्री) या क्रमांकावर संपर्क साधावा.

## आईकू ज़ेड१० लाइट ५जी लवकरच लाँच होणार

**नवी दिल्ली, १३ जून :** उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू १८ जून रोजी त्यांचा नवीन फोन आईकू ज़ेड१० लाइट ५जीलाँच करणार आहे. हा फोन विशेषतः विद्यार्थ्यांसाठी आणि सक्रिय जीवनशैली जगणाऱ्या लोकांसाठी डिझाइन केला आहे. आईकू ज़ेड१० लाइट तुमची दैनंदिन कामे सहजपणे हाताळू शकतेमग ती ऑनलाइन वर्गात जाणे, मित्र आणि कुटुंबाशी जोडलेले राहणे, व्हिडिओ पाहणे, रील्स स्क्रोल करणे, प्रवासात गेम खेळणे किंवा एकाच वेळी अनेक अ‍ॅप्स वापरणे असो. हे दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि जलद ५जी कनेक्टिव्हिटी देते, ज्यामुळे तुम्ही दिवसभर कोणत्याही व्यत्ययाशिवाय अभ्यास आणि मनोरंजनाचा आनंद घेऊ शकता.

6000mAh क्षमतेच्या मोठ्या बॅटरीने सुसज्ज, ज़ेड१० लाइट ५जी फोनला अवजड न बनवता तुम्हाला जास्त काळ कामगिरी देतो. आईकू ज़ेड१० लाइट हा त्याच्या सेगमेंटमधील सर्वात मोठी बॅटरी असलेला ५जी स्मार्टफोन देखील आहे. वर्गात जाणे असो, असाइनमेंट पूर्ण करणे असो, कंटेंट ब्राउझ करणे असो किंवा मित्रांसोबत संपर्कात राहणे असो - त्याची बॅटरी दिवसभरातील विविध गरजा सहजपणे पूर्ण करू शकते.




हे मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० ५जी प्रोसेसरद्वारे समर्थित आहेअत्यंत पॉवर-कार्यक्षम ६एनएम चिपसेट आणि अपग्रेडेड ऑक्टा-कोर आर्किटेक्चरद्वारे समर्थित. आईकू ज़ेड१० लाइट तुम्हाला एक गुळगुळीत आणि लॅग-फ्री मल्टीटास्किंग अनुभव देते.

या डिव्हाइसमध्ये ५० मेगापिक्सेल सोनी एआय मुख्य कॅमेरा आणि २ मेगापिक्सेल दुय्यम लेन्स आहे जो पार्श्वभूमी अस्पष्ट करण्यासाठी वापरला जातो. यात ५ मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा देखील आहे, जो दररोजच्या फोटोग्राफीसाठी वापरता येतो. याशिवाय, फोनमध्ये अनेक एआय आधारित टूल्स आहेत जे फोटो एडिटिंग आणि इतर कामांमध्ये मदत करतात.

एआय इरेजसह, तुम्ही फोटोमधून निवडलेल्या वस्तू काढून टाकू शकता,

एआय फोटो एन्हान्स हे चेहरे अधिक स्पष्ट दिसण्यासाठी आणि जुने किंवा अस्पष्ट फोटो सुधारण्यासाठी आहे.

याव्यतिरिक्त, यात एक एआय डॉक्युमेंट मोड देखील आहे जो डॉक्युमेंटच्या फोटोला स्पष्ट आणि वाचनीय डिजिटल कॉपीमध्ये रूपांतरित करू शकतो.

आयपी६४ धूळ आणि पाण्याचे प्रतिरोधक प्रमाणपत्र असलेले, आयक्यूओ झेड१० लाइट दैनंदिन वापरासाठी योग्य आहे. हे दोन रंगांमध्ये लॉन्च होईल: टायटॅनियम ब्लू आणि सायबर ग्रीन.

'मेक इन इंडिया'चे वचन पुढे नेत, आईकू ज़ेड१० लाइटची निर्मिती वीवो च्या ग्रेटर नोएडा येथील सुविधेत केली जाईल. याव्यतिरिक्त, ग्राहकांना चांगली विक्री-पश्चात सेवा प्रदान करण्यासाठी, आईकू ने आता आईकू ग्राहकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये यासाठी देशभरात पसरलेले त्यांचे ६७०+ कंपनीच्या मालकीचे सेवा केंद्र उघडले आहेत.

## जेव्हा स्त्री द्वेष्टा युग आणि उत्साही कैरी यांचा आमनासामना होतो, तेव्हा ठिणग्या तर उडणारच!

**मुंबई, १३ जून :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका सर्वसामान्य रोमँटिक मालिकेसारखी नाही. जेव्हा एका छताखाली दोन अत्यंत भिन्न प्रकृतीच्या व्यक्ती एकत्र येतात, तेव्हा जो गोंधळ माजतो, त्याचे चित्रण या मालिकेत आहे. भेटा, युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) या बुद्धिमान, गंभीर स्वभावाच्या वकीलाला जो आपल्या तीन भावांसोबत दिल्लीत राहतो आणि स्त्रियांविषयी तीव्र तिरस्कार बाळगतो. या तिरस्काराचे कारण एका फसवणुकीत आणि त्याच्या रहस्यमय भूतकाळात आहे. ही कहाणी युग आणि कैरी (आशी सिंह) या दोघांभोवती फिरते. या दोघांमध्ये प्रेम आणि नातेसंबंध यावरून नेहमी मतभेद होत असतात.

आगामी भागांमध्ये, युग सिन्हाची भेट कैरीशी होते. युग सिन्हा एक कडवट स्वभावाचा वकील आहे, जो दयाभावाने नाही, तर खोल रागापोटी महिलांशी संबंधित केसेसमध्ये ५०% सवलत देतो. दुसरीकडे कैरी एक उत्साही तरुणी आहे, आपल्या तीन भावंडांचा सांभाळ करण्याची कसरत करत आहे. जेव्हा घरमालक कैरीला घर खाली करण्याची नोटिस देतो तेव्हा युग सिन्हा कोर्टात ही केस घरमालकाकडून लढतो. पण, त्याच्यासमोर केस जिंकून कैरी सगळ्यांना धक्का देते. अपमान भावनेने पेटलेला, संतप्त युग छोट्या छोट्या मार्गांनी तिचा बदला घेण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे तिच्या




घरचा पाणीपुरवठा बंद करणे आणि त्यानंतर उडालेल्या गोंधळासाठी कैरीला दोष देणे, वगैरे. दंड भरण्यासाठी देखील कैरी कडे पैसे नसल्यामुळे ती आता कोसळण्याचा बेतात असतानाच नशीब पालटते. युगची आई मायारी (सुप्रिया शुक्ला) हिला कैरीमध्ये आपल्या लाडक्या मुलीचे लताचे प्रतिबिंब दिसते आणि ती युगला कैरीला आपल्याच घरात जागा देण्याची गळ घालते.

एका स्त्रीद्वेष्ट्याच्या घरात कैरी कशी पोहोचणार? आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे युग सिन्हा सोबत एका छताखाली ती कशी राहणार?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युग सिन्हाची भूमिका करणारा शब्बीर अहलूवालिया म्हणतो, युग एक गुंतगुंतीची व्यक्तिरेखा आहे. एका कटू भूतकाळामुळे त्याने आपल्या भोवती उंच भिंती उभारल्या आहेत. आणि त्यात कैरीसारखी स्त्री आपल्या घरात राहायला येणार या कल्पनेने तो हादरून जातो. मला या कथानकात हे आवडलं की, यात फक्त संघर्ष दाखवलेला नाही, तर आपल्या मान्यता आणि पूर्वग्रह यांना आव्हान देणे देखील आहे. कैरी सोबतचा प्रवास प्रेक्षकांइतकाच युगसाठी देखील धक्कादायक असणार आहे. भावनांचे चढउतार, शाब्दिक चकमकी आणि जवळ येण्याचे अनपेक्षित क्षण प्रेक्षकांना बघायला मिळतील.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करत असलेली आशी सिंह म्हणते, कैरी एक अशी मुलगी आहे, जी कधी मागे हटत नाही- कितीही कठीण प्रसंग आला तरी. जो उघडउघड स्त्रियांचा द्वेष करतो त्याच्या घरात राहावे लागेल असे तिला कधीच वाटले नव्हते. पण अशाच परिस्थितीत तिची ताकद आणि चिकाटी दिसून येईल. ही गोष्ट मजेदार, भावनिक आणि युग आणि कैरी यांच्यात ठिणग्या उडवणारी असणार आहे. प्रेक्षकांना मजेदार संभाषण, वाढता तणाव आणि काही हृदयस्पर्शी क्षण देखील दिसतील, ज्याच्यामुळे कदाचित सगळेच बदलून जाईल.

## शब्दकोडे क्रमांक २१३७




आडवे शब्द :-
१) बोकड
८) संध्याकाळ
११) बारीक केस
१२) कोर्टातील दावा
१३) बाजेला विणण्याची सुती चपटी पट्टी
१५) चांदणी
१६) स्थानिक (इं.)
१७) बाण
१९) देशाचे नाणे
२०) तमाशातील गाण्याचा एक प्रकार
२२) पापीजनांना यमाकडून दिल्या जाणाऱ्या यातना
२४) गोड
२५) ब्राह्मण
२६) अखंड, निरंतर(पावसासंबंधीचा शब्द)
२८) दह्याचे सरसरीत पेय
२९) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
३१) बैल
३२) पांढरा तीळ, कितीही मिळाले तरी तृप्ती नाही अशा स्वभावाचा
३३) राखून ठेवणे, रिझर्वेशन
३३) छाती
३५) केस कापणे
३७) एक पौराणिक पर्वत
३९) मेंढा, पहिली रास
४२) आई वडील
४४) मोठी नदी
४५) धनुष्यबाण
४८) निमित्त, सबब
५०) अभंगातील तुकाराम
५१) ममता, द्रव्य
५२) एक पालेभाजी
५३) हाताचा तळवा
५४) अथवा, किंवा
५५) मध
५६) मगर, दहावी रास
५८) हद्द
६०) प्रणाम
६१) गवत
६३) समूह, जमाव
६५) परीक्षा घेणारा
६८) फळातील द्रवपदार्थ
७०) बेडूक
७१) नकटे नाक
७३) आईचा भाऊ
७४) कोवळा अंकुर
७५) पात्याची तीक्ष्णता
७६) अरण्य, वन

उभे शब्द :-
१) पराकाष्टेचा लाभ
२) एक बारीक धान्य
४) चकचकीत, स्वच्छ
५) तळे
६) खालच्या दर्जाचा
७) जाडसर पीठ
९) जन्म-मृत्यू
१०) आपले म्हणणे मांडण्यासाठी पत्रकारांची भरलेली बैठक
१४) रचना, मांडणी, सजावटकरणारा
१६) नवनीत
१८) गोसावी, भटक्या
२१) वडाचे झाड
२३) तिबेटमधील एक प्राणी
२६) शक्यता
२७) तृष्णा
३०) लिहिता-वाचता येणे
३३) प्रयत्नावाचून प्राप्त, मोफत
३४) कामासाठी काम झाल्यावर आलेला माणूस
३६) भाजी घालून केलेली पोळी
३८) एक भटकी जमात
३९) विश्वामित्र ऋषींना भुरळ घालणारी अप्सरा
४०) चक्र
४१) निर्णय
४३) स्वर्गातील पूर्वज
४६) चेहऱ्यावरील तेज, कांती
४७) भ्रमर, भुंगा
४९) रक्कम, ठराविक पैसे
५०) रामचरितमानस लिहिणारे हिंदी संत
५२) पायी चालणारा
५३) हात
५५) आपले काम साध्य करण्यासाठी लाडीगोडी करणे(बो.भा.)
५७) केव्हा
५९) आई(ग्रा.)
६२) असुर
६४) पावा
६५) फुलांची टोपली
६६) ललाट
६७) पृथ्वी
६९) जास्तीतजास्त
७२) पंख
७३) कापड विणण्याचे साधन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेचे शूटिंग सुरू असताना आलेल्या पहिल्या पावसाच्या जादूविषयी सांगत आहे आशी सिंह

**मुंबई, १३ जून :** पहिला पाऊस नेहमी आनंद आणि जुन्या आठवणी घेऊन येतो. आशी सिंह साठी तर यंदाचा पहिला पाऊस जादुई होता. ही गुणी अभिनेत्री सध्या सोनी सबवर नुकत्याच सुरू झालेल्या उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी या धडाडीच्या वकीलाचे पात्र निभावत आहे. गूढ आणि गंभीर दिसणाऱ्या युग (शब्बीर अहलूवालिया) सोबत तिची पडद्यावरची केमिस्ट्री प्रेक्षकांना आत्ताच आवडू लागली आहे.



अलीकडेच आशीने सेटवर असतानाच सीझनच्या पहिल्या पावसाचा अनुभव घेतला- या क्षणामुळे तिचा मूड एकदम इतका मस्त झाला! आणि तो तिच्या व्यक्तिरेखेला देखील साजेसा होता.

त्याविषयी बोलताना आशी म्हणाली, पहिल्या पावसात काही तरी खूप शुद्ध, निर्मळ असे काही तरी असते. असे वाटते की जणू जगाची गती क्षणभर मंदावली आहे. पहिला पाऊस मला नेहमी माझ्या बालपणात घेऊन जातो. ते स्वच्छंद दिवस, पावसात बागडणे, कागदी होड्या पाण्यात सोडणे आणि चिंब भिजल्याबद्दल आईचा ओरडा खाणे! मुंबईच्या पावसात नक्की काहीतरी जादू आहे. सतत घाईगडबडीत असणाऱ्या माझ्यासारख्या मुलीला हे क्षण थोडा विसावा आणि स्वतःशी संवाद साधण्याची संधी देतात.

आशी पुढे म्हणते, यावेळी आम्ही उफ्फ ये लव है मुश्किल ... साठी आउटडोर शूटिंग करत होतो. पावसाचे तुषार येऊ लागले त्यामुळे आम्ही काम थांबवले पण मी त्या पहिल्या पावसात भिजलेच. ओल्या मातीचा सुगंध मला फार आवडतो. पावसात आसपासचे जग जणू क्षणभर थांबून जाते. त्यावेळी मला माझ्या कैरी या व्यक्तिरेखेची आठवण झाली. तिला छोट्या छोट्या गोष्टीत सौंदर्य आणि आनंद शोधण्याची सवय आहे. त्यामुळेच तिची व्यक्तिरेखा विशेष आहे. मला चहा, संगीत आणि ओल्या मातीचा सुगंध हे सगळेच प्रिय आहे. आणि हे सगळे जेव्हा शूटिंगच्या दिवशी जुळून आले, तेव्हा फारच मजा आली. हे असे क्षण असतात, जे तुम्हाला पुन्हा पुन्हा जगावेसे वाटतात.

**आज का अंदाज**

शनिवार १४ जून २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 5 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 246 | 690 | 224 | 270 |
| 390 | 500 | 800 | 900 |
| 480 | 780 | 350 | 469 |
| 21 | 51 | 86 | 96 |
| 24 | 54 | 80 | 90 |
| 27 | 57 | 83 | 93 |

१४ जून २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | 42 | 56 | 76 |
| 39 | 49 | 50 | 70 |
| 31 | 41 | 58 | 78 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.

प्रो. बालाजी कुमार
9822486034

## राशीभविष्य

**मेष :** व्यवसायात संयमाने आणि परिश्रमाने काम करा. तुमच्या व्यवसायात प्रगती आणि उन्नती होईल. आज आरोग्याशी संबंधित कोणत्याही मोठ्या समस्येची शक्यता कमी असेल.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी कनिष्ठ कर्मचाजयांमुळे मतभेद होऊ शकतात. महत्वाच्या कामात अडथळे आल्यामुळे ते पुढे ढकललं जाऊ शकतं. आज तुमचा दिवस संघर्षाने भरलेला असेल.

**मिथुन :** आज तुम्ही मालमत्तेशी संबंधित कामात कठोर परिश्रम केल्यास तुम्हाला यश मिळेल. आईकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. अपेक्षित आर्थिक लाभ न मिळाल्याने खंत वाटेल.

**कर्क :** तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, नियमित व्यायाम करा. काम पूर्ण होण्यात अडथळे येतील. आज आरोग्याची काळजी घ्या. पोट आणि हाडांशी संबंधित आजारांची विशेष काळजी घ्या.

**सिंह :** कोणाच्याही फसवणुकीत अडकू नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा. सामाजिक कार्यात रस कमी होईल. व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल.

**कन्या :** आज तुमची एक जुनी इच्छा पूर्ण होईल. राजकारणात, वरिष्ठ व्यक्तीच्या जवळीकतेचा तुम्हाला फायदा होईल. कामाच्या शोधात आज दूरच्या शहरात जावे लागू शकते.

**तूळ :** नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने कामाच्या ठिकाणी अडचणी कमी होतील. समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** आज तुम्हाला मालमत्ता खरेदी-विक्रीशी संबंधित बाबींमध्ये तुमच्या जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळेल. या बाबतीत कोणताही घाईघाईने निर्णय घेऊ नका. आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**धनु :** आज अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला दूरच्या देशात जावे लागू शकते. तुमच्या आयुष्यात असे काही घडू शकते जे तुम्ही कधीही स्वप्नातही पाहिले नसेल.

**मकर :** आज तुम्हाला मस्त बातमी मिळेल. तसेच एखाद्या महत्त्वाच्या कामात यश मिळेल. स्वादिष्ट जेवणाचा योग आहे. तुम्ही लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कुंभ :** आज कुटुंबात काही शुभ कार्यक्रम होतील. आज व्यवसायावर लक्ष केंद्रित करा. अन्यथा, व्यवसायातील अस्थिरतेमुळे तोटा होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे नीट लक्ष द्यावे.

**मीन :** जे कामाच्या शोधात असतील त्यांना रोजगार मिळेल. तुम्हाला शासन आणि सत्तेचा फायदा मिळेल. आजचा दिवस सकारात्मक राहील. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल.

# स्वस्त शाश्वत हरित सौर ऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्रात आता नवा परिवर्तनाचा मार्ग सुरु - राजेंद्र पवार

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

महावितरण भांडूप परिमंडलातील पेण मंडळ कार्यालयाच्या वर्धापन दिन दि. ११ जून २०२५ रोजी अधिकारी/ कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या उपस्थितीत उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून मुख्यालयातून संचालक (मा सं) राजेंद्र पवार उपस्थित होते. तसेच,प्रमुख पाहुणे म्हणून, भांडूप परिमंडलातील मुख्य अभियंता संजय पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, मुख्य अतिथी म्हणून वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता, दीपक पाटील, भांडूप परिमंडलाचे सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले) प्रवीण रहांगदळे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भक्ती गीत पासून झाली. त्यानंतर, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी मनोरंजनात्मक कार्यक्रमात नृत्य, गाणी, व कविता या सारखे कलागुण सर्वांसमोर



सादर केले . जेवणानंतर, दुसऱ्या सत्रात १०वी व १२वी तसेच विशेष पदवीधर यांचे सन्मान करण्यात आले.

याशिवाय, विद्युत सुरक्षा साप्ताह दरम्यान निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेत यशस्वी झालेल्या कर्मचारी व त्यांच्या पाल्यांचे सन्मान करण्यात आले. त्यानंतर, विशेष अतिथी मा. संचालक (मा सं) राजेंद्र पवार, भांडूप परिमंडलातील मुख्य अभियंता संजय पाटील यांचे आगमन झाले. तदनंतर, मान्यवरांच्या शुभ हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. त्यानंतर, सर्वांनी सुरक्षा प्रतिज्ञा घेतली. मुख्य अभियंता संजय पाटील हे कर्मचाऱ्यांना संबोधित करताना म्हणाले कि, "पूर्वी महावितरणपुढे भारनियमन, वीज उपलब्धता सारखी आव्हाने होती पण आता आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करत आहोत. आपल्याला एक मोठी वीजपुरवठा करणारी कंपनी बनण्यापेक्षा लोकांमधली आवडती कंपनी बनून एक ब्रांड निर्माण करायचा आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे आपले काम खूप महत्वाचे आहे व राज्याच्या विकासासाठी उद्योगांना दर्जेदार सेवा देणे गरजेचे आहे . त्यासाठी, प्रत्येक कर्मचाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जेची सेवा प्रदान करण्याची व सुरक्षा साधनांचा वापर करून काम करण्याचा संकल्प घेतला पाहिजे.

मा. संचालक (मा सं) राजेंद्र पवार सर्वांना संबोधित करताना म्हणाले कि, "अन्न,वस्त्र व निवारा जसी आपली मुलभूत गरज आहे , वीज ही आता आपली मुलभूत गरज बनलेली आहे. शहरी असो, ग्रामीण असो अथवा किती ही दुर्गम भाग असो, प्रत्येक नागरिकांचे जीवनमान उंचावण्यात महावितरणचे मोठे योगदान आहे". ग्राहक संख्या, वार्षिक महसूल, विजेची मागणी व उपलब्धता तसेच वितरण हानी या विविध घटकांच्या माध्यमातून त्यांनी २० वर्ष पूर्वीचे महावितरण व आता चे महावितरण यातील अंतर सर्वांना समजावून सांगितले. ते पुढे म्हणाले कि, महावितरणचे योगदान खूप आहे. २० वर्षाच्या कालावधीत आपण महावितरणच्या यंत्रणेचे सक्षमीकरण केले आहे. जागतिक दर्जाची ग्राहक सेवा ब महसूल वाढी सोबत आपण आपली आर्थिक स्थिती सुद्धा भक्कम केली आहे. आता पर्यंत आपण वीज वितरण करत होतो आता मात्र आपण स्वस्त शाश्वत असणाऱ्या हरित ऊर्जेद्वारे वीजपुरवठा करण्यासाठी सौर उर्जेच्या माध्यमातून वीज निर्मितीला सुद्धा चालना देत आहोत. आपण देशात सर्व प्रथम सौर उर्जेच्या माध्यमातून ४२ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे ध्येय उराशी बाळगलेले आहे व त्यादृष्टीने आपले प्रयत्न सुरु आहेत. त्यांनी वीज यंत्रणेवर सुरक्षितपणे काम करण्याचे आवाहन सर्व कर्मचाऱ्यांना केले.

# 381 सिंचन आणि 45 जलविद्युत प्रकल्पांच्या कामांना गती देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

राज्यातील कृषी आणि ऊर्जा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या कामांना कालबद्ध आणि गतीने पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ३८१ सिंचन प्रकल्पांद्वारे ३० लाख ६८ हजार हेक्टर सिंचन, तर ४५ जलविद्युत प्रकल्पांद्वारे ६२,१२५ मेगावॅट वीज निर्मिती व ९६,१९० रोजगार निर्माण होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या प्रकल्पांमुळे राज्याच्या विकासचक्राला गती मिळणार असून, कृषी समृद्धी, ऊर्जा स्वावलंबन आणि रोजगारनिर्मिती याचे नवे दालन खुले होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित यंत्रणांना कामकाजात गती आणि गुणवत्ता राखण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुख्यमंत्री म्हणाले, "सिंचन प्रकल्प हे शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवणारे आहेत. अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आल्यास शाश्वत शेती शक्य होईल. तसेच, पर्यावरणपूरक वीज निर्मितीचा पाया घालणाऱ्या उदंचन प्रकल्पांच्या अंमलबजावणीला विलंब होता कामा नये."

राज्य शासनाने गेल्या दोन वर्षांत १८५ सिंचन कामांना प्रशासकीय किंवा सुधारित मान्यता दिली आहे, ज्यातून २६.६५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. याशिवाय, १९६ विशेष दुरुस्तीच्या कामांमुळे आणखी ४.०२ लाख हेक्टर क्षेत्राला सिंचन मिळणार आहे.

ऊर्जेच्या बाबतीत, १५ खासगी व सार्वजनिक कंपन्यांशी २४ सामंजस्य करार करून ३.४१ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव अंतिम करण्यात आले आहेत. यामुळे राज्यात उर्जाक्षेत्रात नवा अध्याय सुरु होणार असून हजारो युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीश महाजन, अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह विभागीय अधिकारी उपस्थित होते.

राज्याची सिंचन क्षमता आणि उर्जा उत्पादन क्षमतेत लक्षणीय वाढ करून शेतकऱ्यांना आणि तरुणांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचा निर्धार या बैठकीतून दिसून आला.

# मुंबई महापालिका, नगरपरिषद, नगर पंचायतीच्या निवडणुकीचा बार दिवाळीत फुटणार

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

गेल्या अडीच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुंबई महानगर पालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीला अखेर यंदाच्या दिवाळीत मुहूर्त मिळण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भात नुकतीच प्रभाग रचना अधिसूचना काढली असून ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे दिवाळीत मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बार फुटण्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिका निवडणुका प्रभाग रचने करिता राज्य निवडणूक आयोगाने वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार प्रगणक गटाची मांडणी करण्यासाठी ११ जून ते १६ जून २०२५ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतर १८ जून पर्यंत जनगणनेची प्राप्त माहिती तपासली जाईल. २३ जून पर्यंत स्थळ पाहणी करण्यात येणार असून त्यानंतर ३० जून २०२५ पर्यंत गुगल मॅप वर प्रभागाचे नकाशे तयार केले जातील. नकाशावर निश्चित केलेल्या प्रभाग हद्दी प्रत्यक्ष जागेवर जाऊन ३ जुलै पर्यंत तपासण्यात येणार आहेत. तर ७ जुलै २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीच्या स्वाक्षऱ्या होणार आहेत. त्यानंतर १० जुलै पर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचे नगरविकास विभागाने काढलेल्या अधिसुचनेत म्हटले आहे.

३१ जुलै पर्यंत प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करून त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात येतील. तर ११ ऑगस्ट पर्यंत हरकती सूचनांवर सुनावणी घेतली जाईल. १८ ऑगस्ट पर्यंत सुनावणी हरकतीवरील सूचना शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला मान्यतेसाठी पाठवली जाईल. ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडून अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचने द्वारे प्रसिद्ध केली जाणार आहे. मुंबई महापालिका, नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीची अधिसूचना त्यानंतर जारी केली जाणार आहे. कालावधीनुसार टप्पेनिहाय कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नियोजित वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करून नोव्हेंबर महिन्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

# म्हाडाची ५७ होर्डिंग्जना नोटीस ३० संरचनात्मक अहवाल सादर

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

नव्या होर्डिंग धोरणांतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) मुंबई उपनगरातल्या ५७ होर्डिंग्जना नोटीस पाठवल्या आहेत. त्यापैकी ३० ते ३५ होर्डिंग मालकांनी आपल्या होर्डिंगचे संरचनात्मक परीक्षण अहवाल म्हाडाकडे सादर केले आहेत. गेल्या वर्षी मुसळधार पावसात घाटकोपर येथे अनधिकृत होर्डिंग कोसळून मोठा अपघात झाला होता. त्यानंतर म्हाडाने आपल्या जागांवरील होर्डिंग्जसाठी धोरण तयार केले. अनधिकृत होर्डिंगसाठी अभय योजना राबवली जात आहे. यात योग्य तो दंड आकारून होर्डिंग अधिकृत केले जाणार आहे; मात्र तत्पूर्वी होर्डिंगचा संरचनात्मक परीक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. यानुसार ३० ते ३५ जणांनी अहवाल सादर केला आहे.

# भुयारी मार्गिकेवर १४ लाख प्रवासी

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

मेट्रो ३ भुयारी मार्गिकचा बीकेसी ते आचार्य अत्रे चौक हा टप्पा सुरू झाल्यानंतर आता एक महिना पूर्ण झाला आहे. महिन्याभरात या मार्गिकवर १४ लाख ४९ हजार ९३८ प्रवाशांनी प्रवास केला; मात्र दैनंदिन प्रवासी संख्येत अद्याप ५० हजारांचा टप्पाही गाठता आलेला नाही. आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू झाला. त्यानंतर ७मे २०२५ रोजी बीकेसी ते आचार्य अत्रे चौक हा टप्पा २ अ सुरू झाला. पहिला टप्पा सुरू झाल्यापासून भुयारी मार्गिकवर ५७ लाख ५५ हजार ४२० प्रवाशांनी प्रवास केला. त्यापैकी १४ लाख ४९ हजार ९३८ प्रवासी दुसऱ्या टप्प्यानंतरचे आहेत.

# नवीन क्लिनिकचे काम बंद पाडून खंडणीसाठी धमकी

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

नवीन क्लिनिकचे काम बंद पाडून एका डॉक्टर महिलेला खंडणीसाठी धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी संतोष पाटीलसह दोघांविरुद्ध बोरिवली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही आरोपी माथाडी कामगार युनियनचे पदाधिकारी असल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील तक्रारदार महिला डॉक्टर असून तिचे पतीही व्यवसायाने डॉक्टर आहेत. कांदिवली परिसरात राहणाऱ्या या महिलेने बोरिवलीत नवीन क्लिनिकसाठी एक गाळा खरेदी केला होता. तिथे क्लिनिकच्या इंटेरिअरचे काम सुरु होते. दोन दिवसांपूर्वी तिथे काम सुरु असताना एक व्यक्ती आला आणि त्याने कामगारांना काम बंद करण्यास प्रवृत्त केले. काम करायचे असेल तर माथाडी युनियनला दहा हजार रुपयांचा हप्ता द्यावा लागेल असे सांगून संतोष पाटीलचा मोबाईल क्रमांक दिला होता. यावेळी त्याने तिच्याकडे दहा हजाराची मागणी केली. पेसे दिले नाहीतर त्यांना तिथे काम करता येणार नाही असे सांगून जिवे मारण्याची धमकी दिली होती.

# माहिती आयुक्तांच्या रिक्त पदांवर नियुक्ती

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अडथळा ठरणारा रिक्त पदांचा प्रश्न अखेर सुटला आहे. उच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेनंतर सरकारने राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्तांच्या सर्व रिक्त पदांवर नेमणुका केल्या आहेत. राज्य सरकारने तशी माहिती दिल्यानंतर उच्च न्यायालयाने रिक्त पदांसंबंधित पाच वर्षांपूर्वीची याचिका निकाली काढली.

माजी केंद्रीय माहिती आयुक्त शैलेश गांधी व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पाच वर्षांपूर्वी दाखल केलेली. गेली पाच पाठपुरावा सुरु असलेल्या या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी अतिरिक्त सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी मुख्य माहिती आयुक्तांचे पद आणि राज्य माहिती आयुक्तांची सात पदांवर नेमणुका करण्यात आल्याची माहिती खंडपीठाला दिली. वेळी याचिकाकर्त्या शैलेश गांधी यांच्यावतीने ॲड. सुनील अह्वा यांनी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दुसऱ्या अपीलांच्या निकालासाठी ४५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्याची विनंती न्यायालयाला केली. मात्र आरटीआय कायद्यात दुसऱ्या अपीलांवर निर्णय घेण्यासाठी कोणतीही विशिष्ट वेळमर्यादा नमूद केलेली नाही, असे खंडपीठाने नमूद केले. तीन अतिरिक्त पदे निर्माण करण्याच्या मागणीबाबतचे आर्थिक परिणाम सध्या विचारात घेतले जात असून आवश्यकता भासल्यास त्यावर आम्ही योग्य ती कार्यवाही करू, असे राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला हमी दिली.

# 'बार्टी'च्या धर्तीवर 'आर्टी' सक्षमीकरणास मंजुरी

## पुण्यात मुख्यालय होणार; कर्ज अटी शिथील करण्याचाही प्रस्ताव

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

मातंग समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राज्य शासन कटीबद्ध असून, समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांना अधिक परिणामकारक करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठे पाऊल उचलले आहे. 'बार्टी'च्या धर्तीवर 'आर्टी' संस्थेचे सक्षमीकरण करण्याचे आदेश देत, मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'आर्टी'ला स्वतंत्र ओळख आणि बळ देण्याचा निर्णय घेतला.

सह्याद्री अतिथीगृहात आयोजित मातंग समाजाच्या मागण्यांसंदर्भातील बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. या बैठकीला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री दिलीप कांबळे, आमदार सुनील कांबळे, नामदेव ससाने, अमित गोरखे, जितेश अंतापुरकर, माजी आमदार अविनाश घाटे, रामभाऊ गुंडिले आणि मातंग समाजाच्या संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'आर्टी'साठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करून आवश्यक निधी देण्यात येईल आणि संस्थेचे मुख्यालय पुणे येथे स्थापन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यामुळे मातंग समाजाच्या युवक-युवतींसाठी शैक्षणिक, कौशल्यविकास, रोजगार व नेतृत्वविकासाच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत.

मुख्यमंत्री म्हणाले, "अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणासाठी बदर समिती कार्यरत आहे. मातंग समाजाच्या संघटनांनी आपल्या मागण्या समितीकडे लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सन २०२७ मध्ये होणाऱ्या जातनिहाय जनगणनेच्या आधारे वर्गीकरणात आवश्यक बदल केले जातील."

अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या कर्ज योजनेत जामीनदाराच्या अटी शिथिल करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. यामुळे कर्ज प्रक्रियेत अडथळे दूर होऊन अनेकांना आर्थिक मदत लवकर मिळणार आहे.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या निर्णयांनी मातंग समाजाच्या न्याय्य हक्कांच्या लढ्याला नवे बळ मिळाले असून, शासनाकडून मिळणारी ही दिशा निश्चितच परिवर्तन घडवणारी ठरणार आहे.

# वरळी बीडीडीच्या ५५६ सदनिकांचे दोन आठवड्यांत हस्तांतरण

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

म्हाडाच्या वतीने बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानुसार वरळी बीडीडी चाळीतील ९ हजार ८६९ पुनर्वसन सदनिकांपैकी ३ हजार ८८८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून पुढील दोन आठवड्यात ५५६ सदनिकांचे हस्तांतरण होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या बैठकीत देण्यात आली. तसेच वरळी बीडीडीतील १ हजार ४१९ सदनिकांचे सप्टेंबर २०२५ मध्ये हस्तांतरण करण्यात येणार आहे. तर उर्वरित १ हजार ६४२ सदनिकांचे हस्तांतरण ऑगस्ट २०२७ पर्यंत करण्याचे नियोजन असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत प्रस्तावित सुधारणा यासह म्हाडाच्या विविध अधिनियम अंतर्गत प्रस्तावित सुधारणांचा तसेच म्हाडा मार्फत राबविण्यात येणाऱ्या बीडीडी चाळ आणि इतर प्रकल्पांची आढावा बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी म्हाडाच्या वतीने बीडीडी चाळ पुनर्विकासाच्या सद्यस्थितीबाबत माहिती देण्यात आली.

नायगाव बीडीडी चाळीतील ३ हजार ३४४ सदनिकांपैकी १ हजार ९३८ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून सप्टेंबर २०२५ मध्ये ८६४ सदनिकांचे हस्तांतरण करण्याचे नियोजन आहे. ना.म. जोशी मार्ग बीडीडी चाळीच्या प्रकल्पातील २ हजार ५६० पुनर्वसन सदनिकांपैकी १ हजार २४१ सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी ३४२ सदनिकांचे हस्तांतरण डिसेंबर २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. गोरेगाव येथील सिद्धार्थनगर पत्राचाळ प्रकल्पातील मूळ ६७२ सभासदांना सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आले आहे. या प्रकल्पातील तीन भूखंडावरील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले असून चार भूखंडावरील एकूण १ हजार २४३ सदनिका बांधकामासाठी कार्यादेश जारी करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.

याशिवाय सुरभी गृहनिर्माण संस्था, पोलीस वसाहतींचा पुनर्विकास, आरामनगर अभिन्यासाचा पुनर्विकास, मोतीलाल नगर, अभ्युदयनगर प्रकल्प, वांद्रे रिक्लेमेशन आणि आदर्शनगर वरळी वसाहत, जीटीबी नगर सायन कोळीवाडा वसाहत, पीएमजीपी वसाहत, पूनमनगर प्रकल्प तसेच मुंबई महानगर ग्रोथ हब आदी प्रकल्पांच्या पुनर्विकास प्रकल्पांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडाने योग्य सुधारणा करण्याचे निर्देश फडणवीस यांनी बैठकीत दिले.

# सेवानिवृत्त अधिकारी करार पद्धतीने घेणे अव्यवहार्य

## राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचा आक्षेप

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबत दोन दिवसांपूर्वी शासन निर्णय जारी केला असून शासन निर्णय अवव्यहार्य आहे. शासनाचा निर्णय राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढविणारा व राज्य शासनातील कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये दुजाभाव निर्माण करणारा, अन्याय करणारा आहे, असे मत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने व्यक्त केले आहे. दरम्यान, केंद्राप्रमाणे राज्यातील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्त वय ६० करण्यात यावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे केल्याचे महासंघाचे सरचिटणीस समीर भाटकर यांनी सांगितले.

सद्यःस्थितीत राज्य शासनातील एकूण ७.१९ लाख मंजूर पदांपैकी विविध संवर्गातील सुमारे २.७५ लाख म्हणजेच ३५ टक्के पदे रिक्त आहेत, त्यात दरवर्षी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या ३ टक्के जागांची भर पडत आहे. या रिक्त जागांवर नवोदितांची रितसर भरती करण्याबाबत तातडीने समयबद्ध कार्यवाही करावी, ही देखील महासंघ वारंवार आग्रही मागणी केली आहे. परंतु, वेतन खर्चाची बचत करण्यासाठी रितसर नवीन भरती न करता, निवृत्तांची मानधनावर नियुक्ती तसेच कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती हा प्रकार अनुचित असून, सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे करिअर नियोजन बिघडून त्यांचे आर्थिक शोषण करणारा आहे, असेही ते म्हणाले.

**सेवानिवृत्तीचे वय ६० करा**

महाराष्ट्र शासनातील चतुर्थश्रेणी आणि अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय सद्यः स्थितीत ६० वर्षे असून, केंद्र शासन व २५ घटक राज्यांमध्ये देखील सेवा निवृत्तीचे ६० वर्षे आहे. महाराष्ट्र राज्यात नियुक्तीची वयोमर्यादा खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे अशी असताना, निवृत्ती वय मात्र ५८ वर्षे असणे, ही बाब अत्यंत अव्यवहार्य आहे, असे महासंघाचे पत्रात नमूद केले आहे.

# कामाठीपुराच्या पुनर्विकासासाठी म्हाडातर्फे निविदा प्रसिद्ध

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

दक्षिण मुंबईतील प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या कामाठीपुरा क्षेत्राच्या समूह पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत समूह पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा गुरुवारी जाहीर करण्यात आली आहे.

कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्प राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा क्षेत्रातील गल्ली क्रमांक १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडांचा एकत्रितरीत्या समूह पुनर्विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३ (९) अंतर्गत म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत केला जाणार आहे. प्रकल्पाच्या आराखड्यासाठी मेसर्स माहिमतुरा कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकल्पाचा आराखडा 'कामाठीपुरा पुनर्वसन प्रकल्प अर्बन व्हिलेज' -या नावाने तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पातून म्हाडास ४४००० चौ.मी. क्षेत्र उपलब्ध होणार आहे.

# पोलीस दलात तृतीयपंथीयांचा समावेश होणार

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

शिक्षण, उद्योग क्षेत्रात तृतीयपंथ सेवा बजावत असून महाराष्ट्र पोलीस दलात तृतीयपंथीयांचा समावेश करण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पोलीस सेवेत असणाऱ्या दोन तृतीयपंथीयांची लिंगबदल प्रक्रिया सुरू असून त्यांना शासनाचा पूर्ण पाठिंबा आहे. तसेच नव्याने पोलीस दलात भरती करण्यात येणाऱ्या तृतीयपंथीयांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे आदेश गृह व आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत.

तृतीयपंथीयांच्या महामंडळाची पहिलीच बैठक पार पडली असून यापुढे बैठकीला उपस्थित राहणाऱ्यांना प्रवासासाठी मानधन व विश्रामगृहात निवासाची व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यावेळी दिले.

तृतीयपंथीयांच्या हक्कांसाठी स्थापन करण्यात आलेल्या "महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण व कल्याण मंडळ" यांच्या पहिल्याच बैठकीत अनेक मागण्यांवर चर्चा झाली. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या दालनात पार पडलेल्या या बैठकीस गृह, आरोग्य, महिला व बालविकास विभागांचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्य सचिवांच्या दालनात बैठक पार पडली. या बैठकीला सामाजिक न्याय विभागासह गृह विभाग आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

छत्तीसगड, बिहार, तमिळनाडू, केरळ या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही तृतीयपंथीयांना पोलीस सेवेत सामावून घेण्याचा प्रस्तावावर बैठकीत चर्चा झाली. सध्या महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या दोन ट्रान्समन कर्मचाऱ्यांनी लिंग बदल प्रक्रिया सुरू केली असून, त्यांना शासकीय पाठबळ आणि स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांची गरज असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर गृह व आरोग्य विभागांनी एकत्रितपणे तृतीयपंथीय कर्मचाऱ्यांसाठी लिंगबदल प्रक्रियेचे धोरण तयार करावे, असे आदेश मुख्य सचिवांनी दिले. यासोबतच केंद्र सरकार आणि अन्य राज्यांच्या धोरणांचा अभ्यास करून स्वतंत्र धोरण मार्गदर्शक तत्त्व आखण्याचे सूचित करण्यात आले. या बैठकीस सहउपाध्यक्ष डॉ. सान्वी जेठवाणी, सदस्य ॲड. शिवानी सुरकार, सलमा खान, पार्वती जोगी, ॲड. पवन यादव, रिया आळवेकर, राणी ढवळे, अर्पिता भिसे, शीतल शेंडे, निय पद्मपाणी, डॉ. योगा नंबियार यांचा समावेश होता.

## सुचना

महाराष्ट्र एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट ही अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था आहे, जी एम. ए. सूसाई यांच्या स्थापनेने सुरु झाली. २००६ सालापासून, त्यांच्या नेतृत्वाखाली धारावी ONGC समोर असलेल्या समाज कल्याण केंद्र इमारतीत कांबन हायस्कूल तमिळ शाळा चालवली जात आहे. २००७ पासून, रॉयल सिटी इंग्लिश स्कूल (KG ते इयत्ता ७ वी) देखील सुरु करण्यात आली. त्याचप्रमाणे, जनसेवा शिक्षण संस्था या नव्या व्यवस्थापनाखाली २००७ पासून मराठी शाळा व रॉयल सिटी हायस्कूल (इयत्ता ८ वी ते १० वी) यांचं संचालन देखील एम. ए. सूसाई यांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे.

विद्यार्थ्यांची अनुपस्थितीमुळे मराठी माध्यमाची मध्य MIC शाळा बंद करण्यात आली होती. मात्र, या ट्रस्टचे माजी प्रशासक आनंद वामन कराळे आणि त्यांची पत्नी अर्चना कराळे यांनी एकत्र येऊन वडाळा गणेश स्कूलसोबत बनावट करार तयार करून, महाराष्ट्र सरकारची फसवणूक करत त्यांच्या कुटुंबाच्या नावावर सरकारी निधी गैरप्रकाराने मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर, २६ मे २०२५ रोजी, धारावी ONGC समोर असलेल्या कांबन हायस्कूल आणि रॉयल सिटी स्कूलच्या आवारातील कुलुप तोडून शाळेची महत्त्वाची कागदपत्रे धारावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजु बीडकर यांच्या थेट सहकार्याने ताब्यात घेतल्याचे समजते. याबाबत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, धारावी रॉयल सिटी स्कूलच्या नावाने नव्या शिक्षकांच्या निवडीबाबत समाजमाध्यमांवर अफवा पसरत आहेत. नागरिकांनी अशा खोट्या माहितींवर विश्वास ठेवू नये व कोणताही फसवणूक होऊ नये, यासाठी ही सूचना देत आहोत.

**शाळा नियमितपणे दिनांक १६/०६/२०२५ रोजी सुरू होत आहे.**

**शाळा व्यवस्थापनाच्या आदेशानुसार**

**सी. सगायम**

**सचिव**

**द महाराष्ट्र एज्युकेशन अँड वेलफेअर ट्रस्ट**

**रजिस्टर क्रमांक : E-21628**

**प्लॉट नं. 430/431A, 70 C/D, कांदिवली को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ४०० ०६७.**

# 8 हजार भाडेकरूंचे म्हाडा करणार पुनर्वसन

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

दक्षिण मुंबईतील प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या कामाठीपुरा क्षेत्राच्या समूह पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत समूह पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा गुरुवारी जाहीर करण्यात आली आहे.

दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा क्षेत्रातील गल्ली क्रमांक १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडांचा एकत्रितरित्या समूह पुनर्विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३ (९) अंतर्गत म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत केला जाणार आहे. दक्षिण मुंबईतील अत्यंत महत्वाच्या ३४ एकर जागेवर ९४३ उपकरप्राप्त इमारती असून यामध्ये सुमारे ६ हजार ६२५ निवासी व १ हजार ३७६ अनिवासी असे एकूण ८ हजार १ भाडेकरू वास्तव्यास असून ८०० जमीन मालक आहेत. या क्षेत्रातील इमारती १०० वर्षे जुन्या आहेत. तसेच संपूर्ण भागातील भूखंडाचे निव्वळ क्षेत्रफळ सुमारे ७३, १४४.८४ चौरस मीटर आहे. या क्षेत्रातील इमारतींचे भूखंड हे अत्यंत छोट्या आकाराचे व अरुंद असल्यामुळे समूह पुनर्विकास आवश्यक आहे. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या ८ हजार भाडेकरूंना हक्काचे कायमस्वरूपी घर प्राप्त होणार आहे.

प्रकल्पाच्या आराखड्यासाठी निविदा मागवून माहिमतुरा कन्सल्टन्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकल्पाचा आराखडा 'कामाठीपुरा पुनर्वसन प्रकल्प - अर्बन व्हिलेज' या नावाने तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून रहिवाशांना मोठ्या व सुरक्षित सदनिका, नियोजनबद्ध पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यात येणार आहे. यामध्ये वाणिज्यिक इमारत,

मनोरंजनाचे मैदान यांसारख्या सुविधांचा देखील समावेश असणार आहे. तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून म्हाडास ४४ हजार चौरस मीटर क्षेत्र उपलब्ध होणार असल्याने मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हाडास मोठ्या प्रमाणात गृहासाठा निर्माण करता येईल. तसेच विकासकास ५ लाख ६७ हजार चौरस मीटर क्षेत्र उपलब्ध होणार असून अंदाजे ४ हजार ५०० सदनिका उपलब्ध होणार आहेत.

## जमीन मालकांना मोबदला

कामाठीपुरा क्षेत्रातील जमीन मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाकरता ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची १ सदनिका, ५१ चौरस मीटर ते १०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाकरता ५०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या २ सदनिका, १०१ चौरस मीटर ते १५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाकरता ५०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या ३ सदनिका, १५१ चौरस मीटर ते २०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाकरिता ५०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या ४ सदनिका, २०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडाच्या पुढील प्रत्येक ५० चौरस मीटर भूखंड क्षेत्रफळाकरता ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची १ अतिरिक्त सदनिका जमीन मालकांना दिली जाणार आहे.



# बालांगण


## काळजी घ्यायलाच हवी

**आरोग्य जपा**

मुलांनो, पुन्हा एकदा कोविड-१९ चा धोका वाढल्याचे तुम्ही ऐकत असाल. आधी या साथीच्या रोगाने किती हाहाकार माजवला होता, हे तुम्हाला आठवतच असेल. तेव्हा कोविड-१९ संसर्ग रोखण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, हे समजून घ्या. हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये सहजपणे पसरू शकतो. म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी वावरताना तुम्हाला विशेष काळजी घ्यायला हवी. चला तर मग, स्वतःचे संरक्षण करण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेऊ या.

सर्वात पहिली बाब म्हणजे सर्दी, खोकला, ताप यासारखी कोणतीही लक्षणे दिसल्यास लगेचच घरातील मोठ्यांना सांगा. लक्षणे लपवू नका. कम कुवत प्रतिकारशक्ती किंवा कोणत्याही आजाराने ग्रस्त असणाऱ्यांना या आजाराचा धोका अधिक असतो. म्हणूनच काळजी घ्या.

सध्या सामाजिक अंतर ठेवणे म्हणजेच लोकांपासून सुमारे एक मीटर अंतर ठेवणे महत्त्वाचे आहे. तुमच्या आजूबाजूचे लोक आजारी नसतील तरीही सुरक्षित अंतर ठेवा. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा. तुम्हाला गर्दीच्या ठिकाणी जावे लागणारच असेल किंवा तुम्ही मोकळे वारे नसणाऱ्या ठिकाणी असाल तर मास्क नक्की घाला. मास्क व्यवस्थित बसणारा हवा. मास्क काढल्यानंतर स्वच्छ प्लास्टिकच्या पिशवीत ठेवा. तो धुता येत असेल तर दररोज धुवा. डिस्पोजेबल असेल तर दररोज नवीन मास्क घाला आणि वापरलेला मास्क कचऱ्याच्या डब्यात टाका.



मित्रांनो, साबण आणि पाण्याने हात पूर्णपणे स्वच्छ करा. हात धुणे शक्य नसेल तेव्हा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरचा वापर करा. जेवण्यापूर्वी किंवा चेहऱ्याला स्पर्श करण्यापूर्वी हात स्वच्छ करा. शाळेत पोहोचल्यानंतर आणि शाळेतून घरी आल्यानंतरही हात धुवा. शिंकताना आणि खोकताना तोंड आणि नाक रुमालाने किंवा टिशूने झाका. वापरलेला टिशू ताबडतोब डस्टबिनमध्ये फेकून द्या आणि हात धुवा. हात स्वच्छ नसतील तर डोळे, नाक आणि तोंडाला अजिबात हात लावू नका.

## पावसाळ्यात दुर्गंधी सतावते?

**करुन तर पाहा**

पावसाळा सुरु झाला आहे. या दिवसात कपडे ओलसर राहिल्यामुळे, सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे कपड्यांना तसेच त्यामुळे शरीराला दुर्गंधी येऊ शकते. ओलाव्यामुळे बॅक्टेरिया वाढू लागतात आणि तेच दुर्गंधी निर्माण करतात. मित्रांनो, ती दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय करता येतील. आज त्याचीच माहिती घेऊ या.



* लिंबू आणि गुलाबपाणी मिसळून लावल्याने कुबट वास निघून जातो. लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिड असते, जे त्वचेची पीएच पातळी संतुलित करते आणि बॅक्टेरिया वाढण्यापासून देखील रोखते. गुलाबपाणी त्वचा थंड करते आणि त्याचा सुगंध देखील दुर्गंधी कमी करतो. म्हणूनच यासाठी अर्धा लिंबू एक चमचा गुलाबपाण्यात पिळून कापसाच्या मदतीने काखेखाली आणि इतर घामाच्या ठिकाणी लावा. १५-२० मिनिटे असेच राहू द्या आणि नंतर पाण्याने धुवा. यामुळे तुम्हाला स्वच्छ वाटेल. शरीराला येणारी दुर्गंधी कमी होईल.

* बेकिंग सोडा कुबट, घामाचा वास शोषून घेतो आणि नैसर्गिक दुर्गंधीनाशक म्हणून काम करतो. नारळाच्या तेलात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. ते शरीरावर बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखतात. हे मिश्रण लावल्याने शरीराची दुर्गंध निघून जातो. त्यासाठी दोन चमचे बेकिंग सोड्यात एक चम चा नारळ तेल मिसळून पेस्ट करा आणि त्वचेवर लावा. १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या. यानंतर कोमट पाण्याने धुवा. यामुळेही पावसाळ्यातील दमटपणाने शरीराला येणारी दुर्गंधी दूर होईल.

* घामाचा वास दूर करण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगरही खूप प्रभावी आहे. त्यात अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल गुणधर्म असतात जे घामाचा वास कमी करतात. इतकेच नव्हे तर ते घामामुळे होणाऱ्या बॅक्टेरियाच्या वाढीस देखील प्रतिबंधित करतात. याचे लाभ मिळवण्यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे सफरचंद सायडर व्हिनेगर मिसळा आणि कापसाच्या मदतीने घाम येतो त्या भागांवर लावा. १० मिनिटे तसेच राहू द्या, नंतर थंड पाण्याने स्वच्छ करा. तुम्ही हे मिश्रण दररोज वापरू शकता.





## फोनमध्ये पाणी गेले?

**टाळा या चुका**

छोट्या दोस्तांनो, पावसाळ्यात फोन भिजण्याचा, त्यात पाणी शिरण्याचा मोठा धोका असतो. वेगवेगळ्या कारणांसाठी सतत स्मार्टफोन वापरावा लागत असल्यामुळे पावसात भिजला की भलती काळजी वाटते. असे झाल्यास तुम्हीही घाबरत असाल. लगेच फोन सुरू करण्याचा किंवा सुकवण्याचा प्रयत्न करत असाल. परंतु तुम्हाला अजिबात घाई करण्याची गरज नाही. कारण तुमची एक छोटीशी चूक फोन कायम चा खराब करू शकते. तेव्हा फोन भिजल्यास कोणत्या चुका टाळायच्या हे जाणून घ्या.

* पावसात भिजल्यानंतर बरेचजण फोन तपासण्याचा प्रयत्न करतात आणि तो योग्यरित्या काम करत आहे की नाही हे पाहण्यासाठी लगेचच चार्ज करतात. पण ही एक मोठी चूक आहे. यामुळे फोनमध्ये शॉर्ट सर्किट होऊ शकते. मोठा अपघात संभवतो. म्हणूनच फोन ओला असताना कधीही चार्जिंगला लावू नका.

* पावसात फोन भिजल्यानंतर काही मुले तो हेअर ड्रायर किंवा हीटरने वाळवण्यास सुरुवात करतात, परंतु तुम्ही असे अजिबात करू नये. हेअर ड्रायर आणि हीटरमधून येणाऱ्या उष्णतेमुळे फोनच्या अंतर्गत भागांचे नुकसान होऊ शकते. यामुळे संवेदनशील घटक वितळू शकतात आणि स्क्रीन आणि बॅटरीलाही नुकसान होऊ शकते. म्हणून अशी चूक अजिबात करू नका.



* फोन भिजला तर तो तांदळात ठेवावा, यामुळे फोन लवकर सुकतो असे काहींना वाटते. परंतु यामुळे फोनमधील ओलावा पूर्णपणे निघून जात नाही. बऱ्याच वेळा तांदूळ चार्जिंग पोर्टमध्येही अडकतो. म्हणूनच हा उपायही अयोग्य आहे.

* फोन हलवल्याने आतील पाणी निघून जाईल असे काहींना वाटते. परंतु उलट असे केल्याने पाणी फोनच्या इतर भागांमध्ये जाऊ शकते.

## आता दही कमी खा

**स्टे हेल्दी**

उन्हाळ्यात तुम्ही दही खाल्ले असेल. थंड दही, रायता किंवा लस्सी असे वेगवेगळे प्रकार खाऊन उन्हाळा सुसह्य करण्याचा प्रयत्न केला असेल. हे सर्व घटक उष्णतेपासून आराम देतात आणि पोट निरोगी ठेवतात. दह्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने आणि प्रोबायोटिक्स सारखे पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहते. परंतु तुम्हाला माहिती आहे का की पावसाळ्यात दररोज जास्त दही खाणे तुमच्यासाठी हानिकारक देखील असू शकते... हो, आता आहारात दही कमी खा कारण याचे काही तोटे आहेत. आज ते जाणून घेऊ या.


पावसाळ्यात दररोज जास्त प्रमाणात दही खाल्ल्याने बद्धकोष्ठतेची तक्रार होऊ शकते. दह्याचा परिणाम थंड असतो आणि तो काही मुलांच्या पचनसंस्थेला अनुकूल नसतो. यामुळे पचनक्रिया मंदावते. म्हणूनच वारंवार बद्धकोष्ठतेची समस्या येत असेल तर मर्यादित अ प्रमाणात दही खा.


दही आरोग्यदायी असले तरी त्यात कॅलरीज देखील असतात. विशेषतः पूर्ण चरबीयुक्त दही साखर मिसळून खाल्ले तर जास्तीच्या कॅलरीज पोटात जाऊन वजन वाढू शकते. म्हणूनच दह्याचा अतिरेक टाळा.



दह्याचा प्रभाव थंड असल्यामुळे या दिवसात पोटात वात वाढू शकतो. दही जास्त प्रमाणात खाल्ल्यास शरीराला सूज येऊ शकते. काही मुलांना जास्त दही खाल्ल्याने पोट फुगण्याचाही त्रास होतो. विशेषतः दही आंबट असेल किंवा रात्री ते खाल्ले तर पोटदुखी जाणवते. दह्यामध्ये असणाऱ्या लॅक्टिक ॲसिडमुळे पोटात गॅस आणि जळजळ होऊ शकते. म्हणूनच रात्रीच्या वेळी दही अजिबात खाऊ नये. काही मुलांना दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी असते. अशांना दही खाल्ल्यानंतर पोटदुखी, जुलाब, गॅस किंवा उलट्या होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हालाही दुग्धजन्य पदार्थांची कोणतीही समस्या असेल तर दही टाळा किंवा कमी प्रमाणात खा.

**ठिपके जुळवा**





## माहिती आहे?

**माहिती आहे?**


दोस्तांनो, कॉफीचे निरनिराळे ब्रँड्स प्रसिद्ध आहेत. आपल्या घरात कॉफी पावडर असते. ती उकळून अथवा दुधात मिसळून गरमागरम कॉफी तयार होते. कॉफीची लागवड करण्यापासून पूड तयार करण्यापर्यंतची प्रक्रिया बरीच मोठी आहे. कॉफी नेमकी कशी तयार होते याबाबतची ही रंजक माहिती...

कॉफीच्या बिया असतात. नव्याने पेरलेलं कॉफीचं रोपटं वाढून त्याला फळं लागेपर्यंत तीन ते चार वर्षांचा कालावधी लागतो. कॉफीच्या फळाला 'चेरी' म्हटलं जातं. कॉफीची पिकलेली चेरी लाल रंगाची असते. कॉफीच्या मळ्यात काम करणारे लोक कोणत्याही यंत्राचा वापर न करता हातांनी तोडूनच कॉफीच्या झाडावरची फळं काढतात. एक कर्मचारी दिवसभरात साधारणपणे १०० ते २०० पाउंड कॉफी चेरी वेचतो. यापासून २० ते ४० पाउंड कॉफी बीन्सची म्हणजेच कॉफीच्या बियांची निर्मिती होते. कॉफीची लागवड साधारणपणे पावसाळ्याच्या आसपास म्हणजे मातीत ओलावा असताना केली जाते.

फळं वेचल्यानंतर कॉफी निर्मितीच्या प्रक्रियेला लगेच सुरूवात करावी लागते. नाहीतर फळं खराब होऊ शकतात. सर्वप्रथम कॉफीची फळं उन्हात वाळवून घेतली जातात. या चेऱ्यांमधला ओलावा निघून गेल्यानंतरच कॉफी तयार केली जाते. यासाठी काही आठवडे किंवा महिनेही लागू शकतात. आकारानुसार आणि प्रकारानुसार कॉफीच्या बियांची निवड केली जाते. खराब झालेल्या बिया टाकून दिल्या जातात. चांगल्या दर्जाची कॉफी निर्यात केली जाते.

## प्रयोगातून शिका

**कार्यानुभव**



मुलांनो, तुम्ही मित्रमैत्रिणींसवे हसतखेळत विज्ञान शिकू शकता. आज असाच एक गमतीशीर प्रयोग करून बघू या.

**साहित्य :** काचेच्या दोन रिकाम्या बाटल्या, दोन स्ट्रॉ, चुना मिसळलेलं पाणी (या पाण्याला कॅल्शियम हायड्रॉक्साइड म्हणतात), साधं पाणी इत्यादी.

**कृती :** सर्वात आधी एका बाटलीत चुना मिसळलेलं तर दुसऱ्या बाटलीत साधं पाणी भरा. चुना मिसळलेलं पाणीही साध्या पाण्यासारखं रंगहीन असतं. आता दोन्ही बाटल्यांमध्ये स्ट्रॉ ठेवा. मित्र किंवा मैत्रिणीला साध्या पाण्याची बाटली द्या. चुना मिसळलेल्या पाण्याची बाटली तुमच्याकडे ठेवा. आता तुम्हा दोघांनीही या स्ट्रॉ मधून फुंकर मारायची आहे. फुंकर मारल्यामुळे साध्या पाण्यात काहीच बदल होणार नाही. पण चुना मिसळलेल्या पाण्याचा रंग मात्र दुधासारखा पांढराशुभ्र होईल. फुंकर मारल्यामुळे बाटलीत कार्बन डाय ऑक्साइड मिसळतो. कार्बनची कॅल्शियम हायड्रॉक्साइडसोबत रासायनिक प्रक्रिया होते आणि कॅल्शियम हायड्रॉक्साइडचं रुपांतर कॅल्शियम कार्बोनेटमध्ये होतं. याचा रंग पांढरा शुभ्र असतो. म्हणूनच सुरूवातीला रंगहीन असणारं चुन्याचं पाणी फुंकर मारल्यावर पांढऱ्या रंगाचं होतं.



## स्पेस सायंटिस्ट व्हायचंय?

**कोण होणार?**

मुलांनो, तुम्हालाही अंतराळात दडलेली गुपितं उलगडावीशी वाटत असतील. अर्थातच यासाठी तुम्हाला अंतराळ संशोधक म्हणजे स्पेस सायंटिस्ट व्हावं लागेल. 'इस्रो'मध्ये स्पेस सायंटिस्ट बनण्यासाठी तुम्हाला गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण व्हावं लागेल. यासोबतच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीची प्रवेश परीक्षाही द्यावी लागेल. एअरोस्पेस इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, रेडिओ इंजिनिअरींग आदी शाखांमध्ये पदवी मिळवणारे विद्यार्थी अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात जाऊ शकतात. इस्रो अशा गुणवंताच्या शोधात असतं. मात्र इथे प्रवेश मिळवण्यासाठी तुमच्याकडे प्रचंड हुशारी असायला हवी. 'इस्रो' हुशार मुलांचीच निवड करतं. त्याबरोबर अंतराळाची ओढ, उत्सुकता, कल्पकता हे गुणही असायला हवेत. 'इस्रो'तर्फे आयसीआरबी परीक्षेचं आयोजन केलं जातं. ही परीक्षा इलेक्ट्रॉनिक, मॅकेनिकल आणि कॉम्प्युटर अशा तीन विभागांमध्ये घेतली जाते. बीई, बीएससी तसंच आयआयटी या विषयात पदवीला ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले विद्यार्थी ही प्रवेश परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेसाठी बरीच तयारी करावी लागते. तेव्हा तयारीला लागा.

## प्लास्टिकमुक्त देशासाठी...

**महत्त्वाचे काही**




दोस्तांनो, प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची तुम्हाला माहिती आहे. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकमुळे प्रदूषणात मोठी भर पडते. प्लास्टिकच्या पिशव्या, ग्लास, शीतपेयांच्या बाटल्या, स्ट्रॉ यासारख्या वस्तूंची गणना सिंगल यूज प्लास्टिकमध्ये होते. या वस्तू आपण एकदाच वापरतो आणि टाकून देतो. म्हणूनच हळूहळू सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी करत त्यावर पूर्णपणे बंदी घालण्याची योजना आखली जात आहे. मित्रमैत्रिणींनो, तुम्हीही प्लास्टिकचा वापर कमी करायला हवा. प्लास्टिकच्या पिशव्या वापरणं बंद करायला हवं. फक्त पिशव्याच नव्हे तर तुमच्या शालेय साहित्यातल्या बऱ्याच वस्तूही प्लास्टिकच्या असतात. त्यातील बरंच साहित्य एकदा वापरून टाकून दिलं जातं. अर्थात या वस्तूंना पर्यायही सापडायला हवेत. प्लास्टिकचं विघटन होण्यास काही हजार वर्षांचा कालावधी लागतो. प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर वस्तू रिसायकल केल्या नाहीत तर त्या पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात.

### स्मार्ट टिप्स

#### नियोजन करा



मुलांनो, अभ्यास आटपण्यासाठी वेळेचं नियोजन करणं गरजेचं आहे. यासाठी दिवसभरातल्या कामांची यादी करून घ्या. अभ्यासाचा प्राधान्यक्रम ठरवा. कोणत्या विषयाचा अभ्यास कधी करायचा हे आधी ठरवून घ्या. मग अभ्यासाला लागा. यामुळे तुमचं काम सोपं होईल.

### खादाडी

#### चीज कॉर्नफ्लेक्स



मित्रांनो, आवडत असल्यास तुम्ही चिज कॉर्नफ्लेक्स खाऊ शकता. यासाठी एक कप कॉर्नफ्लेक्स, अर्धा कप भाजलेले दाणे, दोन चमचे किसलेलं चीज, पाव चमचा लाल तिखट, एक चमचा बटर आणि चवीनुसार मीठ असं साहित्य घ्या. सर्वात आधी मायक्रोवेव्ह १८० अंश सेल्सियसला प्रीहिट करून घ्या. गरज असल्यास यासाठी मोठ्यांची मदत घ्या. आता एका काचेच्या बाऊलमध्ये कॉर्नफ्लेक्स, बटर, दाणे, चीज, तिखट आणि मीठ असं साहित्य घाला. नीट हलवून घ्या. यानंतर बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. दोन मिनिटं गरम करा. गरमागरम चीज कॉर्नफ्लेक्स खा.

### दोस्त हे मस्त


#### जग पेंग्विनचं



मुलांनो, पेंग्विन हा एक पक्षी आहे. पण त्याला उडता येत नाही. हे पक्षी मासे खातात. ते दक्षिण गोलार्धात, थंड वातावरणात रहातात. न्यूझीलंडमध्येही पेंग्विन आढळतात. त्यांचे डोळे पिवळ्या रंगाचे असतात. लिटिल ब्लू पेंग्विन ही पेंग्विनची सर्वात लहान प्रजाती आहे. या पेंग्विनची उंची फक्त १६ इंच असते तर एम्परर पेंग्विनची उंची जवळपास तीन फूट असते. पेंग्विन बर्फावर तुरुतुरु चालतात.

### वाचा तर खरं

#### कशासाठी... पोटासाठी...



दोस्तांनो, पोटाचं आरोग्य उत्तम असायला हवं. म्हणूनच पोटासाठी काही योगासनं आहेत जी नियमितपणे करायला हवी. त्यापैकी एक आसन म्हणजे पादोगुष्ठनासा स्पर्शासन. या आसनामुळे पाठ आणि मानेचे स्नायू बळकट होतात. पचनक्रिया सुधारते. पोटाच्या बारिकसारीक तक्रारी दूर होतात. त्यामुळे या आसनाची माहिती घ्या आणि नियमितपणे करा.



# शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

## गुंतवणूकदारांना सुमारे 2 लाख कोटींचा फटका

**सेन्सेक्स 81,118**

**निफ्टी 24,718**

मुंबई, दि. १३ प्रतिनिधी

शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेंसेक्स आणि निफ्टी-५० हे दोन्ही प्रमुख निर्देशांक लाल चिन्हावर बंद झाले. ही घसरण प्रामुख्याने इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावासह अमेरिकेच्या व्यापार शुल्कांबाबत असलेल्या अनिश्चिततेमुळे झाली.

सेंसेक्सने शुक्रवारी ८०,४२७ पातळीवर व्यवहार सुरू केला आणि ०.७० टक्क्यांनी घसरून ८१,११८ पातळीवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी ने २४,४७३ वर सुरुवात करत ०.६८ टक्क्यांची घसरण नोंदवली आणि २४,७१८ पातळीवर बंद झाला.

या कालावधीत बीएसईवर लिस्टेड असलेल्या कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील सुमारे ४५० लाख कोटी रुपयांवरून कमी होऊन सुमारे ४४८ लाख कोटी रुपये राहिले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसात सुमारे २ लाख कोटी रुपयांचा फटका बसला.

निफ्टी ५०मधील सर्वाधिक नफा कमावणाऱ्या कंपन्यांमध्ये बीईएलने १.७६ टक्के वाढ नोंदवली, ओएनजीसीमध्ये १.४७ टक्के वाढ झाली, टेक महिंद्रामध्ये ०.८९ टक्के, टीसीएसमध्ये ०.३४ टक्के आणि विप्रोमध्ये ०.२४ टक्के वाढ झाली.

दुसरीकडे, सर्वाधिक घसरण अडाणी पोर्ट्समध्ये झाली ज्याचा शेअर २.८३ टक्क्यांनी खाली आला. त्यानंतर आयटीसी आणि एसबीआयमध्ये प्रत्येकी १.६९ टक्के, इंडसइंड बँकेत १.५८ टक्के आणि हिंडल्कोमध्ये १.४३ टक्क्यांची घसरण झाली. बहुतेक सर्व सेक्टोरल निर्देशांक लाल चिन्हावर बंद झाले. मात्र, निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांकात १.५१ टक्क्यांची वाढ झाली, निफ्टी मीडिया निर्देशांकात ०.१७ टक्के आणि निफ्टी रिअल्टीमध्ये ०.०६ टक्क्यांची किरकोळ वाढ झाली. त्याचबरोबर, निफ्टी पीएसयू बँक निर्देशांकात १.१८ टक्के, निफ्टी एफएमसीजीमध्ये १.०५ टक्के, निफ्टी बँकमध्ये ०.९९ टक्के, निफ्टी मेटलमध्ये ०.९६ टक्के, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये ०.९२ टक्के आणि निफ्टी इंडिया टुरिझममध्ये ०.९० टक्क्यांची घसरण झाली. या घसरणीमुळे बाजारात अस्थिरता वाढली असून गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. आगामी आठवड्यात जागतिक आणि देशांतर्गत घटनांवर बाजार कसा प्रतिसाद देतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सोन्याची उसळी!

## दर १ लाख पार

मुंबई, दि. १३ वृत्तसंस्था

सोने पुन्हा १ लाख पार झाले आहे. मल्टी कमोडिटी एक्स्चेंजवर शुक्रवारी सोन्याच्या वायदे दरात २ टक्के म्हणजेच २ हजारांची वाढ झाली. यामुळे सोन्याचा प्रति १० ग्रॅम दर १ लाख ४०० रुपयांवर पोहोचला. तर चांदीचा दर ८०० रुपयांनी वाढून प्रति किलो १ लाख ६ हजारांवर गेला. एमसीएक्सवरील सोने दराचा हा सर्वकालीन उच्चांक मानला जात आहे.

इस्रायलने शुक्रवारी पहाटे इराणमधील अनेक ठिकाणांवर हल्ला केला. यात इराणच्या अण्विक तळांचा समावेश आहे. यात इराणचे मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. इस्रायलने या कारवाईला 'रायझिंग लायन' असे नाव दिले आहे. असे मानले जाते की इराण या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देईल.

इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आणि कमकुवत डॉलर निर्देशांकामुळे सोन्याच्या दरात वाढ झाली असल्याचे सराफा बाजारातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ज्यावेळी जगात भू- राजकीय तणाव वाढतो, तेव्हा सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून गुंतवणूकदार सोने खरेदीकडे वळतात. परिणामी सोन्याच्या दरात वाढ होते.

गुरुवारी सोन्याचा दर १.७ टक्के वाढून प्रति १० ग्रॅम ९८,३९२ रुपयांवर पोहोचला होता. तर चांदीचा दर ०.४ टक्के वाढून प्रति किलो १,०५,८८५ रुपयांवर बंद झाला होता. या आठवड्यात सोने दरात ३.५ टक्के वाढ झाली आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातही स्पॉट गोल्डचा दर १.३ टक्के वाढून प्रति औंस ३,४२८ डॉलवर पोहोचला आहे.

# अधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी परिवहन मंत्री सरनाईक यांना मराठी पत्रकार परिषदेचे निवेदन



बीड, दि. १३ प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व अधिस्वीकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी- स्लीपर बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाड्यांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही. आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन महाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.

# लंडनला जाण्यासाठी आधी 19 जूनचे होते बुकिंग

## पतीच्या बर्थडेसाठी प्लॅन बदलला, 12 जूनचे तिकिट काढले

इंदूर, दि. १३ वृत्तसंस्था


अहमदाबाद ते लंडन जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचा गुजरातमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात २०० हून अधिक लोकांना जीव गमवावा लागला. या अपघातात इंदूर येथील एका महिलेचाही जीव गेला आहे. गुरुवारी दुपारी घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण देशात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्घटनेतील मृतांमध्ये इंदूरची हरप्रीत होरा या महिलेचाही समावेश होता. एअर इंडियाच्या प्रवासी यादीत तिचे नाव ६५ नंबरच्या सीटवर होते. हरप्रीत तिच्या पतीला भेटण्यासाठी लंडनला जात होती. मात्र या दुर्घटनेत तिचा जीव गेल्याने कुटुंबात शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे हरप्रीतचे तिकिट आधी १९ जून रोजी होते परंतु १६ जूनला पतीचा बर्थडे असल्याने तिने ते तिकिट कॅन्सल करून १२ जूनचे तिकिट काढले होते.



हरप्रीत इंदूरच्या राजमोहल्ला परिसरात राहणाऱ्या होरा कुटुंबातील सून होती. तिचे पती रॉबी होरा मागील ३ वर्षापासून लंडनला एका खासगी कंपनीत नोकरी करतात. हरप्रीत आणि रॉबी यांचे लग्न २०२० साली झाले होते. हरप्रीत बंगळुरुत खासगी कंपनीत काम करत होती. वर्क फ्रॉम होम असल्याने ती लंडनला जाण्याच्या तयारीत होती.

हरप्रीतच्या कुटुंबाने सांगितले की, तिने आधी लंडनला जाणारे तिकिट १९ जूनचे बुक केले होते. परंतु आमच्या मुलाचा म्हणजे तिच्या पतीचा वाढदिवस १६ जून रोजी होता. त्यामुळे १९ जूनचे तिकिट कॅन्सल करत तिने १२ जूनचे तिकीट काढले आणि दुर्दैवाने हाच तिचा अखेरचा प्रवास ठरला. या दुर्घटनेमुळे हरप्रीतच्या माहेरी आणि सासरी दोन्ही कुटुंबाला धक्का बसला आहे. काही दिवसांपूर्वीच ती माहेरी राहून आली होती आणि इथूनच लंडनसाठी जाणार होती.

दरम्यान, या दुर्घटनेची माहिती कुटुंबाला मिळताच सगळ्यांचे डोळे पाणावले. काही तासांपूर्वीच हरप्रीतला प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या होत्या. परंतु कुणालाही साधी भनकही लागली नाही की काही मिनिटांनी सर्वकाही बदलणार आहे. हरप्रीतच्या अपघाताची बातमी मिळताच रॉबी लंडनहून इंदूरला येत आहे तर कुटुंबातील काही सदस्य अहमदाबाद येथे रवाना झालेत अशी माहिती रॉबी होराचे काका जसवीर होरा यांनी माध्यमांना दिली.



# वडिलांनी रिक्षा चालवून शिकवले, पहिल्यांदाच मुलगी विमानात बसली अन् हाच प्रवास अखेरचा ठरला

अहमदाबाद, दि. १३ वृत्तसंस्था

या विमान अपघातात पायल खाटीक नावाच्या मुलीचाही जीव गेला आहे. मूळचे राजस्थानचे असलेले पायलचे कुटुंब गेल्या काही काळापासून गुजरातच्या हिंमतनगर भागात राहत होते. पायल एका खासगी कंपनीत काम करायची आणि कंपनीकडून तिला लंडनला पाठवले जात होते. पायलचा हा पहिलाच विमान प्रवास होता. त्यामुळे ती खूप उत्सुक होती. मात्र तिचा हाच प्रवास अखेरचा ठरला आहे. पायलचे वडील सुरेश खाटीक हे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. अत्यंत कठीण परिस्थितीशी सामना करत त्यांनी संघर्षात मुलीला शिकवले. मात्र तीच अचानक त्यांच्या आयुष्यातून निघून गेली आहे.



पायलच्या मृत्यूच्या बातमीने कुटुंबाला धक्का बसला.

पायलच्या विमान अपघाताची बातमी कळताच आईने हंबरडा फोडला तर वडील सुरेश खाटीकही धाय मोकलून रडत होते. जाण्यापूर्वी पायलने वडिलांशी संवाद साधला होता. पप्पा, काळजी करू नका, मी सांभाळून जाईन, पहिल्यांदाच फ्लाईटमध्ये बसलीय परंतु सर्व ठीक असेल असं ती म्हणाली होती. पायल खटीक ही विमानात पहिल्यांदाच बसली होती, त्यामुळे तिला विमानतळावर सोडण्यासाठी कुटुंबातील सर्वच सदस्य गेले होते. पायलनेही फ्लाईटमध्ये बसल्यावर व्हिडिओ कॉल केला होता. परंतु जेव्हा विमान दुर्घटना कळली तेव्हा कुटुंबाच्या पायाखालची जमीन हादरली.

# पालिकेतील घन कचरा व्यवस्थापन खाते व परिवहन खात्याच्या खाजगीकरण विरुद्ध लढा

मुंबई, दि. १३ प्रतिनिधी




मुंबई महापालिका कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये म.न.पा. प्रशासनाने सुरू केलेल्या एकतर्फी खाजगीकरणाच्या विरोधात प्रचंड नाराजी आणि तीव्र संताप आहे. कामगार-कर्मचाऱ्यांनी आरपारची लढाई लढण्यासाठी तयार राहावे. व म.न.पा. प्रशासनाकडून सुरू असलेल्या खाजगीकरणा विरोधात एकजूटीने तीव्र लढा उभारून होणारे खाजगीकरण हाणून पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले. असे आवाहन पालिकेतील सर्व कामगार संघटनांच्या संघर्ष समितीच्या नेत्यांनी कामगारांना केले.

मुंबई महापालिकेतील घन कचरा व्यवस्थापन खात्यांतर्गत साफसफाई आणि परिवहन खात्यातील कामे 'एरिया बेस'च्या नावाखाली ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी पालिका प्रशासनाने १४/०५/२०२५ रोजी काढलेल्या टेंडरला विरोध करण्यासाठी विविध संघटना एकत्र येऊन स्थापन केलेल्या म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समितीच्यावतीने नुकतेच दादर येथील श्री शिवाजी मंदीर येथील सभागृहात म्युनिसिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड मेळावा झाला.या मेळाव्यात कामगार नेत्यांनी हे आवाहन केले.

या मेळाव्याला'म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समिती''च्यावतीने घेण्यात आलेल्या मेळाव्यामध्ये म्युनिसिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस वामन कविस्कर व कार्याध्यक्ष यशवंतराव देसाई, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम, सरचिटणीस सत्यवान जावकर, उपाध्यक्ष संजय कांबळे-बापेरकर, संजय वाघ, मुंबई म्युनिसिपल कामगार संघाचे कार्याध्यक्ष शेषराव राठोड, सरचिटणीस संजीवन पवार, दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने, कार्याध्यक्ष सुनिल शिंदे, उपाध्यक्ष रंगनाथ सातवसे व नरेश चौहाण, म्युनिसिपल मजदूर संघाचे सरचिटणीस प्रकाश जाधव आणि कचरा वाहतुक श्रमिक संघाचे अध्यक्ष ॲड. दिपक भालेराव व सरचिटणीस मिलिंद रानडे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या मेळाव्याच्या अनुषंगाने मुंबई महापालिकेचे आयुक्त यांना तातडीने पत्र पाठवून कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये असलेली नाराजी कळविण्यात यावी. तसेच म.न.पा. प्रशासनाने सफाई खाते आणि परिवहन खाते खाजगीकरण करण्यासाठी काढलेले टेंडर तात्काळ रद्द करावे अशी मागणी करण्यात यावी. जर का म.न.पा. प्रशासनाने १६ जून २०२५ पर्यंत काढलेले टेंडर रद्द केले नाही तर दि. १७ जून २०२५ रोजी सर्व कामगार, कर्मचारी एकजूटीने आझाद मैदान येथे येऊन पुढील तीव्र आंदोलन करण्याचे जाहीर केले जाईल. असा निर्णय'म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समिती''च्यावतीने घेण्यात आला.

ऐन पावसाळ्यात मुंबईतील जनतेला त्रास होऊ नये म्हणून संघर्ष समितीच्यावतीने म.न.पा. प्रशासनाला विनंती करीत आहोत की सदर टेंडर ताबडतोब रद्द करण्यात यावे अन्यथा कामगार, कर्मचाऱ्यांनी तीव्र आंदोलन हाती घेतल्यास मुंबईतील नागरीकांना होणाऱ्या त्रासास म.न.पा. प्रशासन जबाबदार असेल. तसेच संघर्ष समितीच्यावतीने मुंबईतील सर्व नागरिकांनी कामगार, कर्मचाऱ्यांच्या भावना समजून घेऊन होणाऱ्या आंदोलनास सहकार्य करावे असे आवाहनही या वेळी करण्यात आले.

# गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी यूपीआय

**आपल्या कष्टाच्या पैशाची शेअर मार्केट मध्ये योग्य पद्धतीने गुंतवणूक करून ठराविक कालावधीनंतर आपल्याला योग्य तो परतावा मिळावा यासाठीच शेअर मार्केट मधील ब्रोकर्सच्या माध्यमातून अनेक लोक आपला पैसा गुंतवतात मात्र अनेकदा अनोळखी,त्रयस्थ अशा ब्रोकर्स अथवा दलाला कारवी गुंतवणूक दारांची फसवणूक होते. आणि अक्षरशः पैसा पाण्यात जातो. यासाठीच गुंतवणूकदारांची मध्यस्थांकरवी होणारी फसवणूक टाळण्यासाठी सेबीने युपीआय हि सेवा सुरु केली आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**१] गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी सेबीने युपीआय सेवा सुरु केली आहे ती नेमकी काय आहे?**

शेअर बाजारात विविध साधनांच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यासाठी अनेक गुंतवणूकदार ब्रोकर्स सारख्या मध्यस्थांची मदत घेतात. या मध्यस्थाकडे डिमॅट खाती उघडून त्यात रक्कम जमा करून त्याद्वारे हि गुंतवणूक तो मध्यस्थ अथवा ब्रोकर करतो. अशी रक्कम गुंतवणूकदारांकडून घेताना ब्रोकर्स किंवा त्रयस्थ गुंतवणूक यंत्रणेकडून गुंतवणूकदारांची फसवणूक होऊ शकते. हे टाळण्यासाठी त्या यंत्रणेला युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस [युपीआय ] ओळख क्रमांक आयडी दिला जाईल. त्यामुळे फसवणूक होणार नाही अशी हि सेबीची योजना आहे.

**२] या युपीआय आयडी मुळे गुंतवणूकदारांना कशा प्रकारे सुरक्षितता मिळणार आहे?**

युपीआय आयडी दिल्यामुळे गुंतवणूकदारांना पारदर्शक पेमेंट्स प्रणाली उपलब्ध होईल,जेणेकरून आर्थिक फसवणूक टाळता येईल. युपीआय आयडी सेबी नोंदणीकृत ब्रोकर्स किंवा निधी गोळा करणारे मध्यस्थ याना हक्क दिले जाणारा आहेत. या नाविन्यपूर्ण यंत्रणेमुळे रोखे बाजारातील आर्थिक सुरक्षितता आणि सुलभता लक्षणीय रित्या सुधारेल. यामुळे गुंतवणूकदारांना सुरक्षित पेमेंट चॅनेल उपलब्ध होईल.

**लोकरंग**

**साप्ताहिक संवाद**

**३] सेबी चेक हि सुविधा देखील सेबीद्वारे सुरु होणार आहे त्याबद्दल?**

गुंतवणूकदारांना सक्षम करण्यासाठी,बाजार नियामक सेबी चेक नावाची नवी सुविधा देखील लवकरच विकसित करणार आहे. सेबी चेक हे साधन गुंतवणूकदारांना युपीआय आयडी ची सत्यता पडताळणयासाठी गुंतवणूकदारांना सक्षम करेल. असे करण्यासाठी गुंतवणूकदार एक क्युअर कोड स्कॅन करून किंवा युपीआय आयडी स्वतः भरून आणि नोंदणीकृत मध्यस्थांचे बँक खाते क्रमांकासारखे तपशील तसेच इंडियन फायनशिएल सिस्टीम कोड याची खातरजमा करून माहिती मिळवू शकेल

# केरळमधील अलेप्पी बॅकवॉटर



**चला पर्यटनाला**

केरळ हे जगातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे, जे नयनरम्य सौंदर्य, हिल स्टेशन्स, बॅकवॉटर आणि तोंडाला पाणी आणणाऱ्या पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे.भारताच्या दक्षिण-पश्चिम टोकावरील देवाचा स्वतःचा देश म्हणून ओळखले जाणारे केरळ हे जगातील सर्वाधिक मागणी असलेल्या पर्यटन स्थळांपैकी एक आहे. केरळमध्ये भेट देण्यासाठी सर्वोत्तम पर्यटन स्थळांपैकी एक म्हणजे कोचीनपासून ५३ किलोमीटर अंतरावर असलेल्या अलेप्पी. अलेप्पी (किंवा अलप्पुझा) मध्ये चमकदार हिरवे बॅकवॉटर, पाम-फ्रिंग्ड तलाव, हिरवीगार भातशेती, रंगीबेरंगी सरोवर आणि १५० वर्षे जुने दीपगृह आहे. केरळमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळ म्हणजे टवटवीत आणि शांत बॅकवॉटर, ज्याला 'पूर्वेचे व्हेनिस' म्हणून संबोधले जाते. बॅकवॉटरवर अर्धा दिवस किंवा पूर्ण दिवस बोट क्रूझ निवडा. अधिक साहसी साठी, रात्रभर समुद्रपर्यटन विचारा. अलेप्पी बीच हा दक्षिण भारतातील सर्वोत्तम समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे आणि हा तलाव, नद्या आणि बॅकवॉटर यांचा संगम आहे. मन्नारसाला मंदिर आणि सेंट मेरीचे सायरो-मलबार कॅथोलिक फोरेन चर्च देखील भेट देण्यासारखे आहे. कृष्णा पुरम पॅलेस चुकवू नका, जो पाथिनारुकेतू म्हणून प्रसिद्ध आहे. हा भव्य राजवाडा तत्कालीन त्रावणकोरचा राजा मार्तंड वर्मा याने बांधला होता आणि तो केरळ-शैलीतील वास्तुकला, शाही कलाकृती आणि भित्तिचित्रांसाठी प्रसिद्ध आहे, ज्यामुळे ते अलेप्पीमधील सर्वात लोकप्रिय ठिकाणांपैकी एक बनले आहे.

# माधवबागतर्फे महाराष्ट्रात योग-चालित प्रतिबंधात्मक आरोग्य चळवळ



**दखल**

भारत मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग यासारख्या जीवनशैलीजन्य आजारांच्या वाढत्या घटनांशी झुंजत असताना, आयुर्वेद-आधारित हृदयरोगाच्या काळजीमध्ये अग्रणी असलेल्या माधवबागने योगाद्वारे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा चालविण्यासाठी आयुष मंत्रालयाशी हातमिळवणी केली आहे. २१ जून रोजी होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा (आयडीवाय २०२५) हा सहयोग आहे, ज्यामध्ये माधवबाग केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्था मुंबई यांच्या नेतृत्वाखालील राज्यव्यापी उपक्रमांना सक्रियपणे पाठिंबा देत आहे.भारतामध्ये सध्या हृदय आणि मधुमेहाच्या रुग्णांचा सर्वाधिक जागतिक भार आहे, ७७ दशलक्षाहून अधिक मधुमेह आणि हृदयरोगांमुळे चारपैकी एकाचा मृत्यू होतो. जीवनशैलीच्या आजाराविरुद्ध आघाडीच्या संरक्षण म्हणून योगाला एकत्रित करून उपचारांपासून प्रतिबंधाकडे लक्ष केंद्रित करणे हे भागीदारीचे उद्दिष्ट आहे.

१२ जून २०२५ रोजी माधवबाग खोपोली रुग्णालयाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १०० हृदयरोग्यांसाठी योग कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. हा कार्यक्रम भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता आणि रुग्णालयाचे संचालक डॉ. रोहित साने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट योग आणि आयुर्वेदाद्वारे हृदयरोग्यांमध्ये समग्र आरोग्य आणि कल्याणाला प्रोत्साहन देणे होते. सहभागींनी मोठा उत्साह आणि समर्पण दाखवले आणि हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला. हृदयरोग्यांमध्ये योग आणि आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्यासाठी रुग्णालयाचे प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहेत. हा कार्यक्रम भव्य यशस्वी झाला.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# लॉजवर गेल्यानंतर प्रियकर आणि प्रेयसीमध्ये वाद

## आर्थिक वादातून प्रेयसीला जागेवर संपवले

कोल्हापूर, दि. १३ प्रतिनिधी

लॉजवर गेल्यानंतर प्रियकर आणि प्रेयसीमध्ये वाद झाला आणि या वादातून प्रियकराने प्रियसीला क्रूरपणे संपवल्याची घटना कोल्हापुरात घडलीये. सांगली कोल्हापूर रोडवरील रूकडी फाटा येथील सागरीका लॉजवर प्रियकराने प्रेयसी महिलेचा निर्घृणपणे खून केलाय. सुमन सुरेश सरगर असे मृत महिलेचे नाव असून आदमगौस पठाण असं संशयित आरोपीचे नाव आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.



अधिकची माहिती अशी की, सांगली कोल्हापूर रोडवरील रूकडी फाटा येथील सागरीका लॉजवर महिलेचा खून झालाय. प्रियकराने प्रियसी महिलेचा हातोड्याचे घाव घालून निर्घृणपणे खून केलाय. सुमन सुरेश सरगर खून करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून आदमगौस पठाण आरोपी प्रियकराचं नाव आहे. प्रियकर पठाण आणि सुमन हे रुकडे येथील सागरिका लॉजवर गेले होते. मात्र, यावेळी प्रियकर पठाण आणि सुमन सरगर यांच्यात आर्थिक वाद झाला आणि त्यातून खून झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, प्रेयसीची हत्या करणाऱ्या पठाणची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे समोर आले आहे. लॉजवर नेऊन प्रेयसीला संपवणाऱ्या पठाणने यापूर्वी स्वत:च्या पत्नीची देखील क्रूरपणे हत्या केली होती. दरम्यान, आता त्याने आर्थिक वादातून प्रेयसी सुमन सुरेश सरगर हिला देखील क्रूरपणे संपवलं आहे.

# पुण्यात संस्थाचालकडून महिला मॅनेजरचा विनयभंग, मनसे आक्रमक

पुणे, दि. १३ प्रतिनिधी

मनसेच्या विद्यार्थी सेनेकडून आज पुण्यातील बावधन परिसरात असणाऱ्या रामचंद्र इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सूरज शर्मा याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं. या संस्थेचे चेअरमन असलेल्या शर्मावर बावधन पोलिस ठाण्यात महिलेची छेडछाड केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. संस्थेत काम करणाऱ्या एका महिलेने शर्माच्या विरोधात तक्रार दिली होती. तक्रारदार महिला ही त्याच संस्थेत काम करत असून शर्माने तिला अनेक वेळा टोमणे मारले.


फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात शर्माने त्या महिलेला "तू खूप छान दिसतेस" असे म्हणत तिचा हात पकडून तिला ओढून तिची छेड काढली. याप्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात या महिलेने तक्रार दिल्यानंतर शर्मा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. मात्र गुन्हा दाखल असून सुद्धा शर्माला अटक का केली नाही हा जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून आज आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी शर्मा विरोधात घोषणाबाजी करत मराठी महिलेवर अत्याचार करणाऱ्या परप्रांतीय सूरज शर्माला अटक झालीच पाहिजे अशी मागणी आंदोलकांनी केली.

# उद्योगपती संजय कपूर यांचे निधन

लंडन, दि. १३ वृत्तसंस्था

बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचा एक्स पती व उद्योगपती संजय कपूर यांचे निधन झाले आहे. इंग्लंडमधील गार्ड्स पोलो क्लबमध्ये ही घटना घडली. पोलो खेळत असताना संजय कपूर खाली कोसळले, त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं, परंतु डॉक्टर त्यांना वाचवू शकले नाहीत.

संजय कपूर हे एक प्रसिद्ध उद्योगपती होते आणि त्यांना पोलो खेळण्याची खूप आवड होती. त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबीय व मित्रांना मोठा धक्का बसला आहे.



संजय कपूर यांचे निधनाआधीचे एक ट्विट सध्या व्हायरल होत आहे, जे त्यांनी त्यांच्या मृत्यूच्या काही तास आधी पोस्ट केले होते. हे ट्विट अहमदाबादमधील विमान अपघाताबद्दल होते. "अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघाताची दुःखद बातमी. माझ्या संवेदना आणि प्रार्थना सर्व पीडित कुटुंबांबरोबर आहेत. या कठीण काळात देव त्यांना शक्ती देवो", असं संजय कपूर यांनी लिहिलं होतं.

संजय कपूर यांनी अहमदाबाद अपघाताआधी आयुष्यासंदर्भात एक पोस्ट केली होती. "पृथ्वीवरील तुमची वेळ मर्यादित आहे. जर तरच्या गोष्टी तत्वज्ञानींवर सोडा आणि त्याऐवजी 'का नाही' याचा आधी विचार करा," असं त्यांनी शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये लिहिलं आहे. ९ जून रोजी संजय कपूर यांनी ही पोस्ट केली होती आणि १२ जून रोजी त्यांचं निधन झालं. निधनाच्या अवघ्या ३ दिवसांपूर्वीची त्यांची ही पोस्ट चांगलीच व्हायरल झाली आहे. त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती का? अशी चर्चा त्यांच्या या पोस्टनंतर होत आहे.

संजय कपूर हे बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचे पूर्वाश्रमीचे पती होय. करिश्मा कपूर आणि संजय कपूर यांचे २००३ मध्ये लग्न झाले होते. या लग्नातून त्यांना दोन अपत्ये झाली. मुलगी समायरा आणि मुलगा कियान. पण लग्नाच्या काही वर्षांनंतर त्यांच्या नात्यात दुरावा आला आणि २०१४ मध्ये करिश्माने घटस्फोटासाठी अर्ज केला. २०१६ मध्ये त्यांचा कायदेशीररित्या घटस्फोट झाला. घटस्फोटाच्या वेळी करिश्माने संजयवर अनेक गंभीर आरोप केले होते. त्यांनी मानसिक व भावनिक छळ केला असं करिश्मा म्हणाली होती.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101